वर्ष ४५
अंक ६

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जून २०२५
ज्येष्ठ/आषाढ
शके १९४७

नमस्कार मंडळी

सर्वप्रथम "ऑपरेशन सिंदूर" तर्फे इस्लामी दहशतवादाची गरळ ओकणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणाऱ्या भारतीय सैन्याचे, भारतीय सरकारचे, आणि सर्व भारतीयांचे हार्दिक अभिनंदन. प्रचंड अभिमान वाटावा अशी ही कामगिरी आहे.

मे महिना म्हंटला की शाळांच्या परीक्षा आल्या. यावर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळेतर्फे दोन प्रकारच्या परीक्षा घेण्यात आल्या. आपली बृहन्महाराष्ट्र मंडळाची परीक्षा आणि या वर्षी प्रथमच प्रायोगिक तत्त्वावर घेण्यात आलेली "महाराष्ट्र शासना" ची म्हणजेच "बालभारती" ची परीक्षा. मला सांगायला अत्यंत आनंद होत आहे की यावर्षी विक्रमी संख्येने मुलांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाची परीक्षा दिली. २,३०० हून अधिक मुलांनी ही परीक्षा दिली (ही संख्या गेल्या वर्षीच्या संख्येपेक्षा ५५ टक्क्यांनी अधिक आहे), तर १०० हून अधिक मुलांनी बालभारतीची परीक्षा दिली. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळेचे संचालक श्री. राहुल देशमुख यांचे व त्यांना मदत करणाऱ्या सर्व शिक्षक वर्गाचे तसेच स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन! इतक्या मोठ्या प्रमाणात परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी त्या मागचे नियोजन, शिस्त, व अचूकतेसाठी केलेला अट्टाहास हे सगळे वाखाणण्याजोगे आहे.

येत्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही विद्यार्थ्यांसाठी छान छान उपक्रम घेऊन येत आहोत:

युवा मार्गदर्शन वर्ग (Mentorship): यात विद्यार्थ्यांना सहा आठवड्यात त्यांच्या आवडीच्या विषयात त्या विषयातील तज्ज्ञांकडून अधिक मार्गदर्शन मिळेल.

भारतातील समाजसेवा (Volunteering): पुण्यातील काही सामाजिक संस्थांमध्ये हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा करायची असेल, तर ती संधी आम्ही उपलब्ध करून देत आहोत. या ठिकाणी विद्यार्थी कितीही दिवस राहून तिथे समाजसेवा करू शकतात.

Routes 2 Roots (India Internship): या उपक्रमामार्फत आम्ही कॉलेजच्या विद्यार्थ्यांना भारतातील कंपन्यांमध्ये internship ची संधी उपलब्ध करून देत आहोत.

सांस्कृतिक सहल: जर तीन-चार कुटुंब एकत्र आली, तर आम्ही तुमच्यासाठी महाराष्ट्रात एखादी सांस्कृतिक सहल आयोजित करू शकतो (उदा शिवनेरी-प्रतापगड-रायगड सहल).

क्रिकेट समर कॅंप: क्रिकेट प्रेमी मुलामुलींसाठी आम्ही डॅलस येथील "रोहित शर्मा क्रिकेट अकॅडमी"बरोबर करार केला आहे. यानुसार उत्तर अमेरिकेतील कोणत्याही मंडळातील सभासदांना सवलतीच्या दरात अर्धा किंवा पूर्ण दिवसाचा अशा एक आठवड्याच्या समर कॅम्प मध्ये भाग घेता येईल.

सांस्कृतिक कार्यक्रम: उन्हाळ्याच्या सुट्टीत मुले रामायण आणि महाभारत यांच्या गोष्टी वाचून आपल्या संस्कृती बद्दल अधिक माहिती करून घेऊ शकतील. त्यानुसार आम्ही पुस्तके उपलब्ध करून देत आहोत. पालकांनी कृपया ही पुस्तके विकत घ्यावीत, ज्यायोगे मुले अभ्यास करून या विषयांवर परीक्षा देऊ शकतील. उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे प्रशस्तीपत्रक देण्यात येईल.

शुक्रवार ७ जून रोजी कीर्तनाचा वर्ग सुरू होत आहे, तसेच 'उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी प्राध्यापकांना' एका मंचावर आणण्यासाठी आम्ही "गुरुपीठ" हा उपक्रम सुरू करत आहोत. वर उल्लेखलेल्या या सर्व उपक्रमांविषयीची अधिक माहिती बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे: https://bmmonline.org/initiatives/ या संकेतस्थळाला भेट दिल्यावर तुम्हाला लक्षात येईल की बृहन्महाराष्ट्र मंडळाचे २५ हून अधिक वेगवेगळे उपक्रम चालू आहेत. या उपक्रमांच्या सर्व प्रमुखांचे व त्यांना मदत करणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे तसेच या उपक्रमांना उत्स्फूर्त पाठिंबा देणाऱ्या मंडळींचे खूप खूप आभार.

सिएटल अधिवेशनाचे संयोजक, श्री. मोहित चिटणीस यांनी अधिवेशना संदर्भातील बैठकीसाठी नुकतीच ऑस्टिनला धावती भेट दिली. या बैठकीत संमेलनातील प्रमुख विषयांवर चर्चा करण्यात आली.

येत्या १३ ते १५ जून दरम्यान क्लिव्हलंड येथे 'BMM मैत्री मेळावा' होत आहे येथील "नॉर्थ ईस्ट ओहायो मराठी मंडळा"ला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांना 'मैत्री मेळाव्या'साठी, तसेच त्यांच्या मंडळाच्या "सुवर्ण महोत्सवी" वर्षासाठी शुभेच्छा! त्याचबरोबर बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे सुप्रसिद्ध गायक डॉक्टर सलील कुलकर्णी यांचा दौरा सुरू होत आहे - या दौऱ्यासाठी शुभेच्छा! मैत्री मेळाव्या मधील सर्व कलाकारांचे व्हिसा वेळेवर मिळण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या 'नॉर्थ ईस्ट ओहायो मराठी मंडळा'चे अध्यक्ष, श्री. उत्कर्ष हजरनीस, तसेच आमच्या समितीतील श्री. पुरू ठाकरे व श्री. संतोष साळवी यांचे विशेष आभार. वटपौर्णिमेच्या शुभेच्छा आणि Happy Father's Day!

जय हिंद-जय महाराष्ट्र! आपला,

- प्रसाद पानवळकर अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Santosh Salvi
4 Azalea Lane, Nashua, NH 03062
Ph: 603 438 9279
Email: santosh.salvi@bmmonline.org

जाहिरातींचे दर: पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

Send your payments to: zelle@bmmonline.org

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)

मताधिकार असलेले सदस्य

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

नियुक्त सदस्य

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

विश्वस्त समिती

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

या अंकात

अध्यक्षीय १
बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती २
२०२६ सिॲटल अधिवेशन वृत्त ३
पाककौशल्य आणि पौरोहित्य वर्ग ४
मुलाखत: डॉ. धनश्री लेले ५
BMM Meditation and Self -Care ८
मराठी शाळा - निबंध स्पर्धा ९
महाराष्ट्र दिन- पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळ १२
कीर्तनाचा वर्ग १२
जाहिरात: Ohio मैत्री मेळावा १३
भारतीय निवास १४
क्रिकेट अकादमी, मेंटॉरशिप १५
जाहिरात: NAFA चित्रपट महोत्सव २०२५ १६
जाहिरात: रेशीमगाठी १६
जागतिक पर्यावरण दिवस १७
मराठीचे दक्षिणायन १८
कचरा - एक संजीवन २०
गुरुपीठ २१
आठवणीतले वास २२
जाहिरात: युरोपियन मराठी संमेलन २४
जाहिरात: Global Investors' Group २४
MANA Paintings २५

संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

२०२६ सिॲटल अधिवेशन वृत्त

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. शाळेचं वर्ष संपून आता उन्हाळ्याच्या सुट्ट्यांची चाहूल लागली आहे. सगळ्यांची भटकंती, मजा हळूहळू सुरू होईलच आणि त्याच बरोबर स्नेहसंमेलनाच्या संयोजन समितीतल्या आम्हां सर्वांच्या कामालाही चांगलाच वेग येईल.

स्नेहसंमेलनाच्या आयोजनासाठी आतापर्यंत पुढे आलेल्या सर्व देणगीदार आणि प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार. ह्या सर्वांच्या पाठिंब्याने आमच्या निधी संकलन समितीचे काम जोमाने सुरू आहे. निधी संकलन समितीने इच्छुक व्यवसायिकांसाठी आणखी काही आकर्षक कॉर्पोरेट पॅकेजेस तयार केली आहेत. त्याबद्दलची सर्व माहिती स्नेहसंमेलनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (bmmseattle2026.org/individual-donor-sponsorship-tiers/). कॉर्पोरेट प्रायोजकांना उत्तर अमेरिकेतील ४००० मराठी ग्राहकांना एकत्र भेटण्याची संधी मिळेल. ध्वनिचित्रफित, स्टँडी, बॅनर, सोशल मिडीया ह्या मार्फत तुमच्या व्यवसायाची जाहिरात करता येईल तसेच एक्स्पो बूथवरून थेट विक्री करता येईल. ह्याचबरोबर आपल्या वैयक्तिक देणगीदारांसाठी असलेल्या प्लॅटीनम पॅकेजवरची $ २०००ची सवलत ३० जूनला संपत आहे, त्यामुळे त्वरा करा! वैयक्तिक पॅकेजची माहिती पुढील लिंकवर उपलब्ध आहे https://bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers/ सर्व इच्छुक प्रायोजकांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा. आमच्या निधी संकलन समितीचे सदस्य तुमच्याशी चर्चा करून तुम्हाला योग्य असे पॅकेज निवडायला मदत करतील.

स्नेहसंमेलनाच्या तयारीच्या दृष्टीने गेल्या महिन्याची सुरुवात आमच्या युवा समितीच्या माहिती सत्राने झाली. युवा समितीच्या प्रमुखांनी स्नेहसंमेलनात युवा वयोगटासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रम आणि उपक्रमांची माहिती दिली. ह्या सत्राला सिॲटलमधल्या युवा मंडळींनी प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन स्वरूपात हजेरी लावली तसेच संयोजन समितीत सहभागी होण्यासाठी नावनोंदणीही केली. इथे वाढणाऱ्या आपल्या पुढच्या पिढीच्या स्नेहसंमेलनातल्या सहभागाच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे.

मराठी शाळा हा बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे चालवला जाणारा महत्त्वाचा उपक्रम आहे आणि स्नेहसंमेलनात शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. संयोजन समितीने ह्या उपक्रमांचे नुकतेच नामकरण केले. ४ ते ११ वर्षे ह्या वयोगटाचे कार्यक्रम 'बालतरंग' तर १२ ते १८ वर्षे ह्या वयोगटाचे कार्यक्रम 'किशोरकुंज' ह्या नावाने आयोजित केले जातील. बालतरंग आणि किशोरकुंज अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे मुलांच्या विविध कलागुणांना वाव दिला जाईल. किशोरकुंज गटातील मुलांना स्नेहसंमेलनाच्या तयारी दरम्यान तसेच प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी स्वयंसेवा (volunteering) करण्याची संधी मिळेल. या सेवेसाठी त्यांना स्वयंसेवेच्या तासांचे अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल. या उपक्रमांमधून किशोरवयीन मुलांना बिएमएम स्नेहसंमेलन म्हणजे काय, त्याचे आयोजन व कार्य कसे चालते याची माहिती मिळेल, तसेच मराठी मित्र-मैत्रिणींमध्ये मिसळून कार्यरत होण्याचा अनुभव मिळेल. किशोरकुंज समितीच्या प्रमुखांनी सिॲटलमधल्या मराठी संस्थांमध्ये जाऊन ह्या विषयी माहिती दिली आणि त्याला पालकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. इतर मंडळांना त्यांच्या शहरांमध्ये आम्ही अश्याप्रकारची सत्रे ठेवण्याची इच्छा असल्यास त्यांनी आमच्याशी baltarang_kishore_info@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती. बालतरंग आणि किशोरकुंजच्या सांस्कृतिक कार्यक्रमांविषयी माहिती आम्ही लवकरच देऊ.

गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर आम्ही स्नेहसंमेलनात सादर करण्यासाठी कार्यक्रमांचे प्रस्ताव स्विकारण्यास सुरूवात केली. सांगायला आनंद होत आहे की भारत तसेच उत्तर अमेरिकेतल्या कलाकारांकडून कार्यक्रमांचे प्रस्ताव यायला सुरूवात झाली आहे. उत्साही सुरूवात बघून आपल्याला दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी मिळणार ह्याची आम्हांला खात्री वाटते आहे! आपण आपल्या कार्यक्रमांचे प्रस्ताव https://bmmseattle2026.org/programming-rfp ह्या लिंक वरून पाठवू शकता. उत्तर अमेरिकेतल्या कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी प्रस्ताव पाठवण्याची अंतिम मुदत दिवाळी पाडवा म्हणजे २२ ऑक्टोबर २०२५ तर भारतातून आणि परदेशांतून येणाऱ्या कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी प्रस्ताव पाठवण्याची अंतिम मुदत गणेश

चतुर्थी म्हणजे २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे. आपले प्रस्ताव पाठवण्यासंबंधी कुठलीही अडचण आल्यास किंवा काही शंका असल्यास programmingrfp@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर आमच्याशी नक्की संपर्क साधा.

स्नेहसंमेलनात आयोजित केल्या जाणाऱ्या नाट्यसृजन ह्या एकांकिका स्पर्धेसाठी ज्यांनी त्वरित प्रतिसाद दिला त्या सर्वांचे मनापासून आभार. तुमच्या नाव नोंदणीमुळे आमचा उत्साह अजून वाढला आहे. उत्तम दर्जेदार एकांकिकांच्या बघण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. ज्या मंडळींना ह्या स्पर्धेत सहभाग घेण्याची इच्छा आहे आणि काही कारणास्तव अजून नावनोंदणी करता आलेली नाही त्यांना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत नावनोंदणी करावी ही विनंती! आत्ता आम्हाला फक्त तुमची सहभागी होण्याची इच्छा कळवा, बाकी तपशील कळवण्याची घाई आत्ता तरी नाही. एकांकिका आमच्याकडे पाठवण्याची अंतिम तारीख २० ऑक्टोबर २०२५ आहे. नावनोंदणीबद्दल कुठली अडचण असल्यास किंवा काही शंका असल्यास आमच्याशी ekankika@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधावा.

स्नेहसंमेलनाची स्मरणिका समिती सर्व उत्साही लेखक मंडळींना तुमची लेखणी सरसावायला साद देत आहे. विषयाला बंधन नाही... कथा, कविता, लेख, विनोद, शब्दकोडी, ललित, तात्विक, वैचारिक, चिंतनपर, मुक्त अश्या अनेक आयामातून तुमची लेखणी संचार करू देत! साहित्य मराठीतून असावे. मुलांनी देखील मराठीतून लिहिण्याचा प्रयत्न करावा, पण मुलांचे इंग्लिश मधील लेख ही स्वीकारले जातील. आपले लेखन ह्या लिंकद्वारे आमच्यापर्यंत पाठवू शकता. लेख पाठवण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ आहे. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे स्मरणिका समिती तुमच्या साठी कथांची स्पर्धा घेऊन येत आहे. तुमच्या कल्पक विचारांना गती द्या आणि तुम्ही लिहिलेल्या १००० ते १२०० शब्दांच्या आकर्षक आणि रंजक कथा स्मरणिकेसाठी पाठवा. अट एवढीच की कथा पूर्णपणे स्वरचित असावी. तुम्ही पाठवलेल्या कथांमधून सर्वोत्तम तीन कथांना विशेष पारितोषिक जाहीर केले जाईल. स्मरणिकेसंबंधी काही प्रश्न किंवा शंका असल्यास smaranika@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर आमच्याशी नक्की संपर्क साधा.

बृहन्महाराष्ट्र मंडळाशी संबंधीत सर्व मराठी मंडळे संस्थांच्या अध्यक्षांना तसेच बीएमएम प्रतिनिधींना आम्ही स्नेहसंमेलनाची माहिती इमेलद्वारे पाठवली आहे आणि ती तुमच्यापर्यंत पोहोचली असेलच.

आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता

फेसबूक: www.facebook.com/bmm2026seattle; इंस्टाग्राम: www.instagram.com/bmm2026seattl_/. तसेच आपल्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधा.

- **पराग सहस्रबुद्धे**, मार्केटींग टीम

तुमच्या पाककौशल्याची थोडी आम्हालाही दाखवा झलक! नवीन पदार्थांचे कौतुक किंवा जुन्या पदार्थांच्या आठवणी पुनर्जीवित करूयात! पाककृती बरोबर तुमच्या पदार्थाचा फोटो जरूर पाठवा, आम्ही वाट बघत आहोत!

शब्द मर्यादा - २०० शब्द; पुढच्या महिन्याच्या वृत्तासाठी आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत MS Word format मध्ये पाठवा

Email: Vrutta@bmmonline.org

पौरोहित्याचे प्रथम स्तर (L1) आणि द्वितीय स्तर (L2) वर्ग लवकरच सुरु होत आहे.

नाव नोंदणी चालू आहे:

https://bmmonline.org/paurohitya/

धनश्री लेले - मुलाखत

धनश्री ताई, आताच झालेल्या आपल्या अमेरिकेच्या दौऱ्यात आपण विविध महाराष्ट्र मंडळांमध्ये ज्ञानेश्वरीतील कर्मयोग, शब्दमोती - मराठी भाषेतून घरंगळणाऱ्या शब्दांचा मोतीहार, पसायदान, लोकाभिराम श्रीराम, कर्मयोगाचा आजच्या जीवनाशी अनुबंध ह्या वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने दिलीत, त्या अनुषंगाने आम्ही आपली ही मुलाखत घेत आहोत.

प्रथम, आमच्या बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या वाचकांसाठी तुम्ही तुमची ओळख करून द्याल का?

हो नक्कीच! मी डॉक्टर धनश्री लेले. मी आता गेली २१ वर्षे या क्षेत्रामध्ये काम करते आहे. म्हणजे, १५ / १६ वर्ष सुरुवातीला मी आधी सूत्रसंचालन मग निवेदन करत होते. मग श्रीधरजी फडके ह्यांच्याबरोबर काम करायला लागल्यामुळे मला खूप ठिकाणी जायला मिळाले. एक ओळख निर्माण झाली. मग हळूहळू अनेकांबरोबर काम केलं. पण, मग नंतर असं वाटलं की आपण नंतर वैयक्तिकरित्या बोललं पाहिजे, ते दीड मिनिट आपल्याला पुरत नाही असं जाणवायला लागलं, निवेदनाच्या मधून. हळूहळू माझे विषय तयार होत होतेच २०१४ पासून. मग, तेव्हापासून मी पूर्णपणे व्याख्यान आणि प्रवचन याकडे वळले.

तुमची अगदी वेगळ्या विषयांवरची आध्यात्मिक आणि भाषाविषयक व्याख्याने असतात. या दोन्ही विषयांचा तुमचा खूप अभ्यासही आहे. तुम्हाला ह्या दोन्ही विषयांची गोडी कशी काय निर्माण झाली?

आमच्याकडे घरात वातावरण खूप छान होते . घरी आजी, आजोबा, आई, बाबा, काका, मी आणि माझा भाऊ असे आम्ही एकत्र असायचो. माझी आई शिक्षिका आणि आजोबा जरी शिक्षक नसले तरी त्यांचा मूळ पिंड शिक्षकाचा. त्यामुळे त्या दोघांचं लहानपणापासून लक्ष असायचं. चुकीचा शब्द वापरला तर लगेच आमचा कान धरला गेलेला आहे. आई मराठीची शिक्षिका असल्यामुळे ती आमच्याकडून पुष्कळ लिहून घ्यायची. म्हणजे इतकं की कधी कधी आम्ही फिरायला गेलो; म्हणजे समजा माउंट अबूला गेलो तर तिथून दर २-३ दिवसांनी आजोबांना पत्र लिहायला सांगायची आणि ते पत्र असं असलं पाहिजे की त्यांना आम्हाला इथे काय दिसलं याची कल्पना यायला पाहिजे. लहानपणी कधी कधी असं लिहायचा कंटाळा यायचा पण त्यामुळे मराठी भाषेकडे लक्ष वेधलं गेलं. आमच्या आजोबांच इंग्रजी अतिशय सुंदर होते. त्यामुळे मला त्याची थोडी गोडी लागली. म्हणजे भाषा हा विषय आपसूक यायला लागला, भाषेकडे लक्ष जायला लागलं. एखादा वेगळा शब्द आला तर कान टवकारले जायचे, असं आपसूक व्हायला लागलं. याशिवाय माझ्या आजोबांनी माझ्या वयाच्या बाराव्या वर्षी संपूर्ण गीता पाठ करून घेतली आणि त्या दिवसापासून मी रोज गीता म्हणते. त्यामुळे आपसूकच गीतेकडे बघण्याचा दृष्टीकोन मिळाला. नंतर मी बी. ए. संस्कृतला असताना आम्हाला भगवद्गीता अभ्यासाला होती. त्यानंतर एम. ए. ला असताना मी वेदान्ताचा अभ्यास सुरू केला. त्यामुळे एका बाजूला भाषेची तयारी होत होती आणि या विषयांमुळे आपसूक अध्यात्माची आवड लागली.

भातखंडे सरांनी शंकराचार्य आणि त्यांच्या साहित्याचा परिचय करून दिला. त्यांनी मला सांगितलं की काही तरी लिहीत राहिलं पाहिजे. ठाण्यामध्ये स्वामी तव शरणम् नावाचं एक मासिक असायचं. तिथे दर महिन्याला मी काही वेगळं लिहावं यासाठी त्यांनी मला प्रवृत्त केलं आणि त्यामुळे माझ दासबोध वाचन सुरू झाल आहे. अशाप्रकारे काही ना काही कारणाने एकेक ग्रंथ माझ्याकडून वाचला गेला. आणि त्यामुळे भाषा आणि अध्यात्म अशा दोन्हींची आवड मनात निर्माण व्हायला लागली...

आधी आई आणि आजोबांचा माझ्या वाटचालीवरती प्रभाव होता आणि नंतर आमच्या भातखंडे गुरुजी यांनी ह्या सगळ्याकडे बघण्यासाठी एक जिव्हाळा निर्माण केला. अभ्यास तर सगळेच करतात पण आमच्या सरांनी हे शिकवले की कुठलीही गोष्ट प्रेमाने कशी करावी आणि हे ग्रंथ इतके सुरेख आहेत की ते तुम्हाला बांधूनच ठेवतात. त्यामुळे हळूहळू त्या ग्रंथांचा ही परिणाम व्हायला लागला.

ताई, तुम्ही एवढ्या सगळ्या वेगवेगळ्या विषयांवरती व्याख्यानं देता; तर तुम्ही त्यासाठी एखाद्या विषयाची निवड आणि तयारी

कशी करता?

आतापर्यंत बऱ्याचदा ७० टक्के विषय मला समोरून आलेले आहेत. उदाहरणार्थ: दासनवमीचा उत्सव आहे तर तुम्ही यावर काहीतरी बोला. जसं 'दासबोधातील सौंदर्यस्थळं' हे मला एकदम सुचलं. त्यांना लक्षात येईना, सौंदर्यस्थळं म्हणजे काय? मी त्यांना म्हंटलं, मला वाचताना जे जे दासबोधामध्ये वेगळेपण वाटलं, त्याची मी नोंद करून ठेवते. आपल्या मनात तरी त्याची जंत्री तयार असते. मी त्यांना म्हंटले की त्या सगळ्याला एक आकार देऊन मी हा विषय मांडीन. मग मी पुन्हा त्या अनुषंगाने दासबोध वाचला. त्याची रचना कशी आहे - आधी मूर्ख लक्षण समास येतो आणि तो झाला की उत्तम लक्षण समास येतो. ही जी रचना आहे नं, की आधी वाईट काय ते दाखवायचे; मग ते बाजूला काढायचे आणि मग त्याच्यामध्ये उत्तम लक्षणांची स्थापना करायची. ही त्यांची रचना मला फार आवडली.

हल्लीची मुलं म्हणतात की ह्याच्यामध्ये खूप रिपीटेशन आहे, एकच ओळ पुन्हा पुन्हा येते - मृत्यू नं म्हणे सानसोर.. - मृत्यू नं म्हणे.. सारखं तेव्हडच येतं. हे का? तर हे म्हणजे hammering आहे, १०० वेळा वाचल्यानंतर माणसाचं मन ते विसरू शकत नाही. मग त्याच्यामधले मानसशात्र असेल, एक एक मुद्दे असे समोर यायला लागले. मग ते मांडून, त्यांचे योग्य ते स्पष्टीकरण देऊन त्याला एक छान आकार देणं; अशा पद्धतीने तयारी केली जाते. सामान्यपणे काय प्रश्न असू शकतील याचा विचार होतोच. मला जे पडले तेच प्रश्न इतरांना पडतील, कदाचित इतरांना इतरही काही प्रश्न पडू शकतात, मग ते काय असू शकतील ते Anticipation मनात ठेवणं आणि त्याच्या अनुषंगाने त्या ग्रंथाकडे बघणं अशा पद्धतीने तयारी सुरू होते. आणि मी कुठेही scripting करत नाही कारण ते केलं की मग तुम्ही त्याच्या मध्ये अडकता. त्यापेक्षा मुद्दे काढून ठेवते. मग माझ्या श्रोत्यांची नाडी कळल्यानंतर हा मुद्दा इथे कुठल्या अनुषंगाने आला तर अधिक चांगला उठून दिसेल, हे निर्णय आपसूकच घेतले जातात. त्यामुळे तयारीसाठी आधी मूळ ग्रंथाचे वाचन करत आपली एक मांडणी आणि सादरीकरण केले जाते.

अमेरिकेच्या दौऱ्यातले तुमचे काही खास अनुभव? तसेच, भारतातल्या आणि अमेरिकेतल्या श्रोत्यांमध्ये तुम्हाला काही फरक जाणवला का?

मी अमेरिकेमध्ये आता चौथ्यांदा आले आणि अनेक ठिकाणी मी आजपर्यंत व्याख्याने दिली. मी अगदी प्रामाणिकपणे सांगते की इथे व्याख्यान देण्याचे एक वेगळे समाधान मिळते. अमेरिकेतला श्रोता मला अधिक इन्क्विझिटिव्ह वाटला आणि त्यांचे स्वतःचे एक मत असते आणि त्याच्या अनुषंगाने नंतरच्या प्रश्नोत्तराच्या वेळेस मला ते जाणवतं. त्यामुळे तिथे एक वेगळा आनंद आणि एक बौद्धिक समाधान मिळतं. या दौऱ्यातसुद्धा मी अनेक वेगवेगळे विषय मांडले. तेव्हासुद्धा अनेकांचे प्रश्न खूप विचार करायला लावणारे होते. उदाहरणार्थ,

मला बे एरियामध्ये एक इतका चांगला प्रश्न विचारला की ज्ञानेश्वर महाराज पसायदानाच्या शेवटी सुखिया झाला म्हणतात. सुख आणि आनंद यांच्यामध्ये फरक असतो. आनंद म्हणजे bliss आणि सुख म्हणजे happiness आहे तर bliss हा सगळ्यात मोठा आहे. मग असं असताना ज्ञानेश्वर महाराज सुखिया झाला का म्हणतात? आनंद का नाही म्हणत? तर हा एक निश्चित विचारांना चालना देणारा किंवा शोध घ्यायला लावणारा प्रश्न आहे. असे प्रश्न आले की खूप आनंद होतो.

BMM मध्ये मी मेघदूतावर बोलले होते आणि गेल्यावेळेला हिंदू धर्मावर बोलले. मला फार आनंद झाला की हिंदू धर्म म्हणजे काय हा प्रश्न होता. त्यामुळे त्याच्या तत्त्वांकडे बघण्याची संधी मिळाली. मी डिस्क्लेमरमध्ये सांगितलं होतं की मी राजकीय परिप्रेक्षात या विषयाकडे बघणार नाही तर धर्म म्हणजे काय यादृष्टीने बघणार आहे. हा विषय ऐकण्यासाठी हॉलच्या दाराबाहेर बाहेर मंडळी उभी होती. या विषयी कुतूहल यातून दिसलं. हा कार्यक्रम दुपारी दीड वाजता म्हणजे जेवण झाल्यावर होता त्यामुळे किती लोकं येतिल याबद्दल मी साशंक होते पण प्रचंड संख्येने मंडळी आली होती आणि कार्यक्रम झाल्यावर सुद्धा अनेक जण प्रश्न विचारायला थांबले होते. वक्ता कधी खऱ्या अर्थाने वक्ता असतो? श्रोता काय पद्धतीचा आहे त्याच्यावरती वक्ता अवलंबून असतो. म्हणजे शाळेतली मुलं खूप चौकस असतील तर शिक्षक अधिक वाचन, अधिक अभ्यास करून येतो. तसं श्रोता खूप उत्सुक असेल आणि त्यांच्या मनात कुतूहल असेल तर मला अधिक आनंद मिळतो. मी अगदी मनापासून सांगते की तो आनंद मला कायम अमेरिकेमध्ये मिळालेला आहे.

आता सुद्धा बुधवार, गुरुवार या कामाच्या दिवशी माझे कार्यक्रम होते. त्यादिवशी कार्यक्रमाला येणं हे अमेरिकेत अवघड आहे. पण संध्याकाळी 6:30 वाज़ता सिएटलमध्ये 'शब्दमोती' हा कार्यक्रम होता आणि त्याला प्रचंड उपस्थिती होती आणि त्याच्यानंतरसुद्धा काही प्रश्नांसाठी बाहेर मंडळी थांबली होती. रात्री उशीर झाला होता तरी आम्ही तिथेच होतो आणि दुसऱ्या दिवशी सगळ्यांना कामावर जायचं होत तरी मंडळी थांबली होती. ही उत्सुकता वक्त्याला खऱ्या अर्थाने प्रेरित करते. ती प्रेरणा मला अमेरिकेतही कायम मिळालेली आहे. भारतामध्येसुद्धा ती कायमच मिळते कारण जे विषय मी मांडते ते ऐकायला येणारा श्रोता वेगळा आहे, त्याचा थोडातरी अभ्यास आहे त्यामुळे तो श्रोता मुळातच वेगळ्या पातळीवरचा, एक थोडा तयारीचा पण आहे. अशा श्रोत्यांसमोर समोर बोलायला भारतात काय किंवा अमेरिकेत निश्चितच आनंद मिळतो. अमेरिकेत मला विशेषत: जाणवलं

कि तुम्ही मुळ धरून ठेवण्याचा जो प्रयत्न करता तो वाखाणण्यासारखा आणि अनुकरणीय आहे. मला दोन्हीकडे बोलताना अतिशय आनंद होतो. आणि अमेरिकेमध्ये सुद्धा मला खूप समाधान मिळते.

धनश्री ताई, तुम्ही आपल्या व्याख्यानातून या ग्रंथावर जे विवेचन करता ते मनाला पटतं आणि भावतं कारण तुम्ही त्यातील तत्वे सद्य परिस्थितीत कशी लागू होतात आणि आज आपल्याला त्यातून काय बोध घेता येईल हे वर्तमान काळातील उदाहरणासह सांगता.

मला असं वाटतं की या ग्रंथांची ती क्षमता आहे कि कुठल्याही काळात हे ग्रंथ वाचले तरी हे ग्रंथ आउटडेटेड वाटणार नाहीत. ही इतकी सार्वकालिक आणि सार्वजनिक आहे की ज्यामध्ये कोणत्याही धर्माचा उल्लेख नाही. त्यामुळे जोपर्यंत माणूस आहे तोपर्यंत ते आहेत. जसं मी अलीकडेच माझ्या पसायदानावरील व्याख्यानात म्हंटलं की भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे! भूतां म्हटल्यानंतर आपण फक्त माणूस म्हणून विचार करतो, पण माणूस म्हणून कित्येकदा माणसाचाही विचार करत नाही आपण तेव्हढा. तर ही मंडळी सांगतात की माणूसच नाही तर या पृथ्वीवर माणसापेक्षाही वेगळे जीवजंतू आहेत. त्यांचाही विचार कुठे तरी करायला हवा आहे. त्यामुळे ही जी ताकद आहे ह्या ग्रंथांची, त्यामुळे अजून १०० वर्षांनीसुद्धा हे ग्रंथ असणार आहेत. ते बोलले जाणार आहेत. फक्त आपल्याला ते decode करता आले पाहिजेत. म्हणजे आजच्या मुलांना या कथा सांगताना त्याला डिकोड करून सांगणे आता आमचे काम आहे असे मला वाटते. नाहीतर मग हे सगळे बाष्कळ आहे, असे त्यांना वाटेल. जे मॅक्समुल्लर काही वर्षांपूर्वी म्हणाले होते की भारतीय ग्रंथ - वेद - पुराणे हे सगळं म्हणजे बाष्कळ आहे. मी म्हणते हे सगळे बाष्कळ अजिबात नाहीये. आमच्या ऋषींची प्रतिभाच अशी होती की कथा लक्षात राहते, पण तत्व नाही लक्षात राहात. तत्व कथेच्या पुडीत बांधून दिले आहे त्यांनी आपल्याला. तर ती कथा decode करणं हे आमचे विशेषत्वाने काम आहे ह्याला नक्की काय म्हणायचे आहे ते कन्टेम्परारी माणसाला समजावून सांगणे गरजेचे आहे.

नवीन पिढीसुद्धा या क्षेत्रामध्ये येते आहे का? ती अशा प्रकारे विद्वत्तापूर्ण, अभ्यासपूर्ण अशी व्याख्याने देत आहे का? आणि, असे असेल तर नवीन पिढीला या क्षेत्रामध्ये तुम्ही काय मार्गदर्शन कराल?

हो, नवीन पिढी १०० टक्के, म्हणजे दोन्ही बाजूनी येते आहे. वक्ता म्हणून आणि श्रोता म्हणून पण. इथेसुद्धा अमेरिकेत मी हा अनुभव घेतला. खूप तरुण मुलं आली होती. इथेसुद्धा, वेगवेगळे विषय घेऊन मुले येतात, त्यांचे खूप चांगले प्रश्न असतात. आणि त्यातले काही जण बोलण्यासाठी पण उत्सुक आहेत. फक्त मी असे म्हणेन की ह्या बोलण्याला थोडासा विचारांचा, चिंतनाचा पाया असणे फार गरजेचे आहे. बाकीचे विषय एखाद्या वेळेस माहितीवर बोलता येतील. पण, हा विषय फक्त माहितीवर बोलता येणार नाही. अनुभवावर बोलायला गेलो तर अगदीच अवघड आहे, आम्ही कोणीच कधीच बोलू शकणार नाही. एकदा अनुभव आला तरी पण हा चिंतनाचा विषय आहे. त्यासाठी संपूर्ण भारतीय संस्कृतीची थोडी तरी माहिती पाहिजे. कारण, ह्या सगळ्या ग्रंथांमध्ये जो प्रकाश आहे ना, तो आपल्या संस्कृतीचा आहे. आज तिथेसुद्धा आपलं एक वेगळेपण काय दिसतं तर आपल्या संस्कृतीचे जे संस्कार झाले आहेत आपल्यावर.

तुम्ही आता एवढी धावपळ असूनसुद्धा का ऐकायला येता? कारण कुठेतरी आपल्या मनावर तो संस्कार झालेला आहे की ज्ञान पहिले आहे. आणि मग ते कुठूनही मिळाले, त्याचा कण जरी मिळाला तरी भारतीय माणूस उत्सुक असतो त्यासाठी. कारण ही ज्ञानाधारित संस्कृती आहे. आणि आपल्या सगळ्या ग्रंथांमध्ये हा ज्ञानाचा प्रकाश आहे. आणि म्हणून, हे ग्रंथ फक्त अभ्यासून चालणार नाहीत. ह्याच्यामागचा जो मूळ विचार आहे संस्कृतीचा तो तो कळणं फार गरजेचं आहे आणि म्हणून अभ्यास करत राहावा. पण एका ठराविक वयानंतर त्याव बोलावं; ते अधिक चांगलं पण दिसतं. तुमच्या स्वतःच्या वृत्तीला एक ठहराव आलेला असतो. आणि हा शेवटी अनुभवाचा भाग आहे. त्यातनं तुम्ही काय शिकत जाता त्याच्यावरचा. सातत्याने वाचत राहणं, चांगलं ऐकत राहणं आणि मुख्य म्हणजे स्वतः चे मन:चिंतन. ग्रंथांची ही पण एक ताकत आहे की प्रत्येकजण आपल्या दृष्टीतून पाहू शकतो हा ग्रंथ आणि आता जी माझी परिस्थिती आहे, जी phase आहे त्या प्रत्येकाला ते applicable आहे. म्हणून ही पण एक ताकत आहे की एकच एक त्याचे decoding आपण करू नाही शकत. मला असं वाटत की गीतेच्या श्लोकाचा हा अर्थ असा आहे, कारण मी स्वतः त्या परिस्थितीतून आत्ता जाते आहे. म्हणून त्याच्यासाठी स्वतः चे चिंतन असणे फार महत्वाचे आहे. मला नेहमी असे वाटते की इतर विषयांमध्ये ही ते लागते, पण ह्या विषयामध्ये १०० टक्के ते लागते. नवीन पिढी खूप चांगल्या पद्धतीने पुढे येतेय, पण त्यांना थोडेसे अधिक वाचन, थोडेसे अधिक मनन आणि चिंतन असणं जरा गरजेचं आहे.

आम्ही इथे सौ. नीलिमा कुलकर्णी ह्यांच्या ज्ञानेश्वरीच्या ग्रुपमध्ये बरेच काही शिकतो. तुमचे 'पसायदान' वरचे व्याख्यान फारच सुंदर झाले. प्रत्येक ओळ आणि ओळीतला प्रत्येक शब्द तुम्ही व्यवस्थित समजावून सांगितला. त्यातील सर्वात प्रभावी भाग हा होता की - श्रीकृष्ण व माउलींच्या विचारांमधील फरक व त्या मागचे कारण. हा पसायदान वाचण्याचा वेगळा दृष्टिकोन अगदी जिवाला भिडून गेला!

कृष्ण अर्जुनाला दुष्टांचा वध कर असे सांगतो तर ज्ञानेश्वर लोकांमधले दोष व कपटीपणा सांडून जावो असा प्रसाद विश्वात्मका कडे मागतात. आणि मग सर्व प्राणिजातना स्वधर्माचा सूर्य दिसायला लागल्या नंतर 'जो जे वांछील तो ते लाहो'. सगळ्यांच्या मनातील इच्छा पुऱ्या होवोत असे माऊली मागतात. हे कसं शक्य आहे? कारण की माउलींच्या समोर बसलेल्या सर्व श्रोते भक्तांनी, श्री कृष्णाच्या गीतेचा संपूर्ण अभ्यास केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या मनात आता दुष्ट भाव राहिलेला नाही. हा अभ्यास कौरवांच्या भाग्यात नव्हता - म्हणून ह्या दोघांचे विचार वेगळे आहेत व मागणेही त्याला अनुसरूनच आहे. ज्ञानेश्वरीतील कृष्ण दोन दिशेमध्ये बोलतो. आधी तो त्याच्या अर्जुनासाठी बोलतो आणि शिवाय तो समोर बसलेल्या ज्ञानेश्वरांच्या अर्जुनांसाठी पण बोलतो. कलियुगामध्ये ज्ञानेश्वरांचा कृष्ण म्हणतो की तुम्ही स्वधर्म पाळला, स्वकर्म केलत तर तुम्हाला तीर्थयात्रेला जायला नको, तुम्ही यज्ञ-यान नाही केलेत तरी चालेल. आता हे सगळं कृष्ण अर्जुनाला सांगत नाही आहे. कारण अर्जुन काही तीर्थ यात्रा किंवा यज्ञ करायला चालला नाही आहे. तर हे सगळं कृष्ण सांगतो आहे ते ज्ञानेश्वरांसमोर बसलेल्या भक्तगणांसाठी! की तुम्ही स्वतःची कामे टाकून पंढरीच्या वारीला जाऊ नका. सगळी कामे पूर्ण करा आणि वेळ मिळाला तर जा. मला असं वाटतं की ज्ञानेश्वरीतला कृष्णाची दोन लक्ष्य आहेत - एक अर्जुन आणि दुसरे म्हणजे समोर बसलेल्या श्रोते. आणि हे जे काही माउलींनी साधलं आहे ते अफाट आहे.

धनश्री ताई, तुमचं व्याख्यान ऐकण्याचा नुकताच योग आला आणि खरोखर फारच छान अनुभव होता. तुमचा आतापर्यंतचा प्रवास आणि तुम्ही व्याख्यानाची तयारी कशी करता त्याबद्दल आम्हाला अगदी छान माहिती दिलीत. वृत्ताच्या वाचकांसाठी तुम्ही वेळ दिलात. त्याबद्दल तुमचे खूप आभार आणि धन्यवाद!

- शुभदा सावरगावकर, नीता धोपेश्वरकर आणि विदुला कोल्हटकर (वृत्त संपादकीय समिती)

BMM's Meditation and Self Care Initiative

आपली मराठी माणसे भारतातून साता-समुद्रापार अमेरिकेत येतात. अपार कष्टाने येथे आपले आयुष्य उभे करतात. ह्या प्रवासात त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना आणि ताण-तणावांना तोंड द्यावे लागते. त्यांना हवा असतो, तो मानसिक आधार, शांतता आणि संतुलन. यासाठीच बृ. म. मंडळ Meditation and Self Care (ध्यान आणि स्व-काळजी) हा उपक्रम चालवत आहे. बृ. म. मं.च्या वृत्ताच्या या आवृत्तीत आम्ही ह्या उपक्रमाच्या संचालक मंडळातील सायली अमरापूरकर आणि अनघा बर्वे यांच्याशी केलेली बातचीत आपल्यासमोर सादर करीत आहोत.

अनघाताई, या उपक्रमाची सुरुवात कशी झाली?

अनघाताई: मी माझ्या ओळखीच्या माणसांना वेदना आणि दु:ख साहताना पाहत होते. त्यांच्यासाठी आपण काय करू शकतो, हा प्रश्न मनात सतत येत होता. आपल्या Psychotherapy क्षेत्रातील अनुभवांचा या बाबतीत काही उपयोग होऊ शकतो का, असेही वाटत होते. ह्याच विचारचक्रातून अशा उपक्रमाची कल्पना पुढे आली. अटलांटिक सिटी येथील २०२२ सालच्या अधिवेशनानंतर त्यावेळचे बृ. म. मं चे अध्यक्ष संदीप दीक्षित यांच्या सहकार्याने आणि पुढाकाराने हा उपक्रम अधिकृत रित्या सुरु झाला.

या कार्यक्रमाचे स्वरूप काय असते आणि तो कधी प्रसारित होतो?

सायली: हा कार्यक्रम zoom च्या माध्यमातून दर रविवारी न चुकता प्रसारित होतो. आमचा एक Whatsapp ग्रुप आहे. त्यात २५०हुन अधिक सभासद आहेत. कार्यक्रम दीड तासाचा असतो, ज्यात विषयाशी संलग्न असे ध्यान (Guided Meditation), सोप्या स्व-काळजी (Self care) पद्धती आणि अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान असते. त्यानंतर प्रश्नोत्तरे होतात. शिवाय या गटातील लोकांना आम्ही व्यक्त होण्यासाठीही वेळ देतो.

पुढे या कार्यक्रमाचा विस्तार कसा झाला? आणि त्याचे स्वरूप कसे कसे बदलत गेले?

अनघाताई: पुढे माझ्याबरोबर श्रीकांत सबनीस, सायली अमरापूरकर, अलका देशपांडे आणि अंजली जोशी जोडले गेले आणि पाच जणांचा आमचा चमू हा कार्यक्रम आयोजित करू लागला. श्रीकांत हे योग- शिक्षक आहेत तर मी मानसोपचारतज्ज्ञ आहे. सायलीचे मानसशास्त्रावर प्रभुत्व आहे. अलका औषधी वनस्पती-तज्ज्ञ आहे तर, अंजली अध्यात्म विषयाची तज्ज्ञ आहे. आमच्या प्रत्येकाच्या आपापल्या क्षेत्रातील ज्ञानाचा वापर करून आम्ही सुरवातीला कार्यक्रम करीत असू. त्यानंतर अमेरिकेतील आणि भारतातील अनेक विषय-तज्ज्ञ आमच्याबरोबर जोडले गेले. पूर्वी फक्त “live” कार्यक्रम होत असत पण आता या कार्यक्रमाच्या ८०हुन अधिक चित्रफिती YouTube वर उपलब्ध आहेत. लोकांना COVIDच्या काळात झूम या साधनाची सवय झाल्याने आम्ही ते स्वीकारले.

तुम्ही या कार्यक्रमाची पूर्व-तयारी कशी करता तसेच विषयाची निवड कशी करता?

सायली: आम्ही एक दोन महिन्यांतून भेटून, चर्चा करून, विषयाची निवड करतो. सणवार, ऋतू, महिन्यातले खास दिवस, आणि श्रोत्यांच्या फर्माइशीनुसार आम्ही विषय ठरवतो. मानसिक आणि शारीरिक आरोग्य, ध्यान, योग , नैसर्गिक उपचार, अध्यात्म, आहार, सजगता (Mindfulness) अशा विविध विषयांचा समावेश आम्ही आमच्या कार्यक्रमांत करून घेतला आहे.

उदाहरणार्थ, मागच्या महिन्यात १८ मे रोजी मानसिक आरोग्य दिवस होता. त्यानिमित्ताने आम्ही “शब्द रूप देऊ मुक्या भावनांना” हा कार्यक्रम केला होता. त्या कार्यक्रमास २२० लोक उपस्थित होते. यात श्री ठाणेदार यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

आम्ही आहार आणि आरोग्य या विषयांवरही काही कार्यक्रम केले आहेत. विशेष म्हणजे, दर Thanksgivingला आम्ही आरोग्याला पोषक अशा पाककृती सादर करतो. आयुर्वेद आणि औषधी वनस्पतींवरचे आमचे कार्यक्रम लोकप्रिय झाले आहेत.

एका महिन्यात आम्ही बुद्ध, हनुमान, राम, कबीर अशा आध्यत्मिक / धार्मिक व्यक्तिमत्वांवर आधारीत कार्यक्रमांची शृंखला सादर केली होती.

खुर्चीच्या आधाराने योग, चक्र-ध्यान, रेकी, प्राणायाम या विषयांवरील कार्यक्रमांना नेहमीच चांगली उपस्थिती असते. कॅन्सरसारखे आजार, हृदयविकार, निरोगी राहणी यांच्यावरही आम्ही विशेष भर देतो.

तुमच्या प्रेक्षकांविषयी थोडे सांगाल?

अनघाताई: अध्यात्माची गोडी वयस्क माणसांमध्ये असते तसेच तरुणाईतही दिसून येते. आमचे काही सदस्य अगदी नियमितपणे दर कार्यक्रमाला उपस्थित असतात. त्यातले काही वयाने मोठे आहेत, काही एकटे आहेत तर काही घरातून हलू शकत नाहीत. ते आमच्या कार्यक्रमाद्वारे इतरांना भेटण्यासाठी उत्सुक असतात. त्यामुळे आम्ही कार्यक्रमातील थोडा वेळ सगळ्यांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी देतो. आम्ही वृत्ताच्या वाचकांना विनंती करतो की, त्यांनी त्यांच्या वयोगटातील माणसांच्या समस्या आम्हाला जरूर कळवाव्यात. आम्ही त्या विषयांवर नक्की कार्यक्रम करू.

बृ. म. मं च्या संमेलनातही तुम्ही कार्यक्रम सादर केले होते....

अनघाताई: हो, मी आणि श्रीकांत यांनी हास्य योग तसेच, मन आणि शरीर यांच्यातील नात्यावर एक कार्यक्रम केला होता तर सायली, अंजली आणि अलका यांनी सजगता, ध्यान आणि आहारविषयक कार्यक्रम सादर केला होता.

ह्या उपक्रमाची पुढची दिशा काय असेल? येत्या महिन्यात कुठले कार्यक्रम आम्ही पाहू शकू?

अनघाताई: बृ. म. मं च्या सहकार्याने आम्ही आमची वाटचाल पुढे चालूच ठेऊ. जून महिन्यात अंकशास्त्र (Numerology) आणि राष्ट्रयोगी अरविंद यांच्यावर खास कार्यक्रम होणार आहेत.

या उपक्रमाची अधिक माहिती, तसेच सहभागी होण्याचा दुवा कुठे मिळेल?

सायली: आमच्या उपक्रमाची माहिती बृ. म. मं च्या संकेतस्थळावर आहे:

BMM Meditation & Self-Care Group

ह्या गटात सामील होण्यासाठी खालील फॉर्म भरू शकता:

BMM Meditation - Self-Care Form

YouTube Link : YouTube- Meditation

आपल्या समाजासाठी अत्यंत आवश्यक असलेला हा उपक्रम तुम्ही इतक्या सातत्याने यशस्वी रित्या सादर करीत आहात, त्याबद्दल तुमचे बृ. म. मं वृत्तातर्फे आभार आणि अभिनंदन. तसेच, पुढच्या वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

- वृत्त संपादकीय समिती

मराठी शाळा - निबंध स्पर्धा

BMM मराठी शाळा

मराठी शाळेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतल्या निबंधापैकी निवडक ६ निबंध प्रत्येक महिन्यात १ हयाप्रमाणे, स्पर्धेसाठी जसे पाठवले गेले आहेत तसे, वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

निबंध ३

माझी आई, माझी प्रेरणा

आई हा सगळ्यांचाच जिव्हाळ्याचा विषय. आई म्हटलं की ममता, वात्सल्य, प्रेम हे भाव तर येतातच पण त्याच बरोबर माझ्या आईकडून मी शिस्त, जिद्ध आणि कणखरपणा शिकले. माझा हा लेख माझ्या आईच्या खडतर जीवन प्रवास, तिच्या कष्टाळू वृत्ती, आणि जीवनाकडे नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याच्या संदेशाबद्दल आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या परुळे गावात आईचं घर आणि वालावली गावात तिचं आजोळ. आईच्या आधी झालेले बाळ जगले नाही. म्हणून आजीला घरी मूल होण्याऐवजी सावंतवाडीच्या रुगणालयात नेण्यात आले. आईचा जन्म १७ मे १९४९ रोजी सावंतवाडीच्या रुग्णालयात झाला. तिचे नाव सुशीला असे ठेवण्यात आले. पुढे लग्नानंतर सुशीला नारायण देसाईची सुषमा सुरेशचंद्र सानप झाली.

जन्मानंतर आईला तिच्या आजोळी आणले. लहान असतांना तिचे आई वडील तिला घेऊन मुंबईला राहायला गेले. ती मुंबईच्या शाळेत काही वर्षे शिकली. आई नंतर ३ मुलांचा जन्म झाला आणि मुंबईत राहणे कठीण होऊ लागले. म्हणून आईला तिच्या मामांनी वालावलीला परत आणले. तिसरी ते सहावी ती बांधकोंडच्या शाळेत शिंकली कारण ती शाळा सहावीपर्यंतच होती. सातवीच्या शिक्षणासाठी ती केळूसला तिच्या मावशीकडे राहायला गेली व त्यानंतरचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण तिने परुळ्याला पूर्ण केले.

आईचे वडील ती लहान असतांना घर सोडून गेले व आजीला ४ मुलांना सांभाळणे खूप कठीण गेले. आईचे मामा महिन्याला २५ रुपये पाठवत असत. आजी शाळेतल्या शिक्षकांसाठी खानावळ चालवत असे आणि डब्बे बनवून देत असे. आईच्या आजोबांच्या थोड्याश्या शेतीत आलेले नारळ आणि भात ह्यावर त्यांचा उदरनिर्वाह व्हायचा. वर्षभरात आईला आणि तिच्या भावंडांना एखादी साडी किंवा परकर पोलके मिळत असे. राहावे लागेल तिथे राहायचे आणि ताटात वाढलेले खायचे हे तिला खूप लहान असतांनाच समजले. त्यामुळेच कदाचित तिच्यात कमालीचा नम्रपणा आहे.

पुढे मॅट्रिक झाल्यावर आई तिच्या काकांकडे मुंबईला राहायला गेली. काका एकटेच कमावते आणि त्यांच्या दोन मुलींबरोबर आईला सांभाळणे त्यांना कठीण जात होते. एकदा एका नातेवाईकांनी आईला वर्तमानपत्रातली एक जाहिरात दाखवली. जाहिरातीतून असे कळले की भारत चीनचे युद्ध चालू असल्यामुळे जखमी सैनिकांची देखरेख करण्यासाठी नर्सेसची कमी होती. जे.जे स्कूल ऑफ नर्सिंग मध्ये महाराष्ट्र शासन मोफत प्रशिक्षण व त्याबरोबर राहण्याची सोय आणि महिन्याचे काही पैसेही देणार असे कळले. आईच्या काकांना खरंतर आपल्या घरातल्या मुलींनी नर्स होणे पटत नव्हते पण खर्च कमी होईल ह्या दृष्टीने त्यांनी आईचा अर्ज पाठवला आणि आईचे नर्सिंगचे प्रशिक्षण सुरु झाले. पुढचे साडे तीन वर्षे आई तिथल्या हॉस्टेल मध्ये राहिली. तिथे तिने जिवाभावाच्या मैत्रिणी मिळवल्या. त्यातली एक मैत्रीण तर आईची मानलेली बहीण झाली आणि ती मावशी आईची बहीण नसून मैत्रीण असल्याचे मला खूप उशिरा कळले.

जे जे स्कूल ऑफ नर्सिंगला असतांना आई देवासाठी फुले आणायला एका फुलवाल्याकडे जात असे. तिथेच एक मुलगा सुद्धा फुले घ्यायला येत असे. त्या फुलवाल्याने त्या मुलाला आईचे नाव लग्नासाठी सुचवले. एकदा आईची फुले आणण्याची वेळ झाली असतांना तो मुलगा त्या दुकानात येऊन थांबला आणि त्याने आईला पाहिले. काही दिवसांनी आई आजारी असतांना तिच्या हॉस्टेलमध्ये तिच्यासाठी फुलांचा गुच्छ आला. आईची मैत्रीण गुच्छ आणायला गेली तेव्हा तिला फुलवल्याबरोबर एक मुलगा दिसला आणि सगळा प्रकार तिच्या लक्षात आला. आई बरी झाल्यावर तिची आणि त्या मुलाची भेट झाली आणि ओळख वाढली आणि काही वर्षांनी त्यांनी लग्न करायचे ठरवले.

आईचे नर्सिंगचे प्रशिक्षण संपल्यावर नोकरीसाठी अर्ज करायला ती वरळीच्या इ. एस. आय. एस हॉस्पिटल मध्ये गेली. तो पर्यंत नोकरी मिळणे कठीण झाले होते. पण अर्ज घेणाऱ्या मेट्रन बाईनी तिला इंग्रजीत असलेला अर्ज भरण्यास मदत केली. का कोणास ठाऊक पण त्या बाईना आई बद्दल आपुलकी वाटली आणि त्यांनी आईला नोकरी मिळवून देण्यास मदत केली. नोकरी लागल्यावर आई बाबांचे लग्न झाले. लग्नानंतर घर घेण्याइतके पैसे दोघांकडेही नव्हते म्हणून काही दिवस काही नातेवाईकांकडे राहिले. मग त्यांना महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या म्हाडाच्या योजनेतून लॉटरी लागली आणि

भाड्याचे घर मिळाले. ते घर २ खोल्यांचे होते. घरात वीज होती पण दिवे पंखे नव्हते.घरासाठी पहिली खरेदी म्हणजे भाड्याने घेतलेला टेबल फॅन.

लग्नानंतरची काही वर्ष सुखाची गेली. पण माझ्या बाबांना दारू आणि सिंगरेटचे व्यसन होते. त्याचा आईला खूप त्रास होत असे. लग्नानंतर एका वर्षाने माझ्या बहिणीचा आणि त्यानंतर तीन वर्षांनी माझा जन्म झाला. बाबा काही वर्ष मुंबईत नोकरी करायचे. पण त्या नंतर त्यांची नाशिकला बदली झाली. महिंद्र अँड महिंद्र कंपनीत उच्च पदावर त्यांची नोकरी होती. पण नाशिकला असतांना आठवड्यातून एकदाच ते घरी येत असत आणि तेव्हाच्या आठवणी फारश्या सांगण्यासारख्या नाहीत. आईने मात्र त्यांच्या व्यसनातून त्यांना बाहेर काढण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यात अनेक जणांनी तिला नोकरी सोडून त्यांच्या बरोबर नाशिकला राहण्याचा सल्ला दिला. पण आमच्या शिक्षणासाठी आणि बाबांच्या व्यसनामुळे त्यांची नोकरी गेली तरी घर चालवण्यासाठी आपली नोकरी असावी ह्या हेतूने तिने तो सल्ला मान्य केला नाही. एकटीने मुंबईत संसार चालवणे सोपे नव्हते. त्यात तिला ३ शिफ्ट्स कराव्या लागत असत. माझी बहीण लहान असल्यापासून दररोज सकाळी ४:३० ला उठायची सवय आईला लागली. सकाळी उठून स्वतःची तयारी, डब्बा बनवून ती माझ्या बहिणीला घेऊन बस ट्रेन मधून प्रवास करून आजीकडे सोडायची व त्यानंतर पुन्हा ट्रेनने हॉस्पिटल मध्ये जायची. नोकरीवरून येतांना माझ्या बहिणीला घेऊन, जेवणाचे सामान घेऊन घरी यायची. आईच्या ऑफिस रेकॉर्डस् मध्ये ती कधीही उशिरा पोहोचल्याची दाखल नाही आहे. वेळेवर काम करण्याची तिची सवय अजूनही आम्हाला निकर्षाने दिसते. केलेल्या कष्टांमुळे तिला नोकरीत बढत्या मिळाल्या आणि ती सिस्टर-इन-चार्जे झाली.

मी आणि माझी बहीण लहान होतो तेव्हा आईचे कष्ट आम्हाला दिसत होते पण तेव्हा त्याचा तिला त्रास होत असावा असे आम्हाला कधी जाणवले नाही. तिचा चेहरा नेहमीच हसतमुख आणि समाधानी असायचा, नकळत तिने आम्हाला खूप काही शिकवले. लहान असतांना तिने आमचे सगळे हट्ट पुरवण्याचा प्रयत्न केला. पैशाची कमी असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यामुळे आमच्यातही एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला.

समोर आलेल्या अडचणींमुळे ती कधीच रडत कढत बसली नाही तर त्यातून सहज रित्या मार्ग काढत पुढे जात राहिली. मी जेव्हा उच्च शिक्षकणासाठी अमेरिकेत आले तेव्हा पहिल्यांदाच घर सोडून लांब राहणार होते. अमेरिकेला निघण्याआधी अगदी शेवटच्या दिवसांपर्यंत माझ्या परीक्षा चालू असल्यामुळे मला विचार करायला फारसा वेळच मिळाला नव्हता. विमानात बसल्यावर मला जाणवले की आपण सातासमुद्रापलीकडे आईपासून लांब राहणार आहोत आणि मी घाबरून गेले. माझे विमान पॅरिसला पोहोचले तेव्हा मी विमानतळावरून आईला फोन केला आणि मी परत येतेय असे सांगितले. आईने तेव्हा माझी समजूत घालत सांगितले, "तू अमेरिकेतल्या तुझ्या विद्यापीठात जा, एक आठवडा तिथे रहा आणि तिथे नाही आवडले तर परत ये. पण सध्या फक्त पढच्या प्रवासाचा आणि येणाऱ्या अनुभवांचा विचार कर." त्यानंतर मी दीर्घ श्वास घेलता आणि माझी भीती पळून गेली. एका आठवड्याने मी रुळू लागले होते. खरं तर मुलगी सातासमुद्रापलीकडे जात असल्यामुळे तिला सुद्धा खूप दुःख होत असणार पण तिने त्याचा विचार नं करता माझी समजूत काढली, धीर दिला, आणि अश्या परिस्थितीचा सामना पुढील आयुष्यात कसा करावा हे शिकवले. त्यामुळे आजही मी कधी भारावून गेले तर मी फार पुढचा विचार न करता आलेल्या परिस्थितीचा कणखरपणे सामना करण्याचा प्रयत्न करते.

तिच्या अनुभवांमुळे तिचा देवावर प्रचंड विश्वास आहे आणि प्रत्येक यशाचे श्रेय आधी देवाला द्यावे हे तिने आम्हाला शिकवले. यश मिळाले तर ज्यांनी आपल्याला मदत केली त्यांना कधीच विसरू नये आणि मिळवलेल्या यशाचा गाजावाजा करू नये अशी तिची शिकवण, तसेच तिच्यात कमालीची शिस्त आहे. घरातली साधीसुधी कामे करतांना सुद्धा तिची शिस्त बघण्यासारखी असते. उदाहरण द्यायचे तर कपडे वाळत घालतांना त्याची घडी पडलेली तिला अजिबात चालत नाही, भाज्या निवडतांना तिचा व्यवस्थितपणा देखण्याजोगा असतो.

आईकडून आज सुद्धा मी खूप शिकते. ती फारसा उपदेश देत नाही पण तिच्या स्वतःच्या वागणुकीतून ती बरंच काही सांगून जाते. माझी आई मला नेहमीच प्रेरणा देत आली आहे पण त्याची जाणीव मला खूप उशिरा झाली. आज आई माझ्याकडे अमेरिकेतल्या माझ्या घरात राहते हे मी माझे भाग्य समजते. आयुष्याच्या संध्याकाळी तिला खऱ्या अर्थाने सुख भोगता आले. तिचे उर्वरित आयुष्य सुखमय राहो अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

\- **भक्ती गोखले**, ऑस्टिन, टेक्सास

बृहन्महाराष्ट्र-तत्वज्ञान उपक्रमाचे
१०० वे सत्र पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन!

पिट्सबर्गमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

शनिवार दिनांक तीन मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या सोहोळ्यात पिट्सबर्गमध्ये पहिल्यांदाच दोन नाटकांचा जंगी कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला! प्रथम पिट्सबर्गच्या बत्तीस बाल कलाकारांनी डॉ. प्रियदर्शन मनोहर लिखित 'महाराष्ट्राच्या संतकथा' हे नाटक सादर केलं. मध्यंतरानंतर पु. ल. देशपांडे लिखित 'तुझे आहे तुजपाशी' ह्या तीन अंकी नाटकाचा सफाईदार नाट्यप्रयोग झाला! अर्थातच नाटकाच्या परंपरेला जागून मध्यंतरात वडा-पाव व चहाची सोय पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाने केलेली होती!

पिस्टबर्गमध्ये मराठी संतांचे आगमन!

महाराष्ट्र दिनाच्या सोहोळ्यात पिट्सबर्गची भूमी महाराष्ट्राच्या संतांच्या आगमनाने प्रफुल्लित, पावन झाली! साक्षात श्री विठ्ठल, ज्ञानेश्वर माउली आणि त्यांची सारी भावंडे, नामदेव आणि जनाबाई, तुकाराम महाराज आणि आवडी, रामदास स्वामी आणि कल्याणस्वामी आणि गाडगेबाबा आणि त्यांचं कुटुंब ही सारी संतमंडळी सगळ्यांना भेटायला आली होती. त्या वेळेचं एक क्षणचित्र सोबत जोडलं आहे. पहा जनाबाई काय म्हणत आहे-

जनी: नामदेवा! काय हे (पिट्सबर्ग, अमेरिकेच्या) पंढरपूराचे अहोभाग्य - निवृत्ती, ज्ञानेश, सोपान, मुक्ताबाई - सगळीच मंडळी आता आपल्या गावी येतील - पंढरीची पांढरी त्यांच्या तेजानं दिपून जाईल -

संत भार पंढरीत
कीर्तनाचा गजर होत ।।
रंग भरे कीर्तनात
प्रेमे हरिदास नाचत ।।
सखा विरळा ज्ञानेश्वर
नामयाचा जो जिव्हार ।।

नाटकाच्या समर्थ दिग्दर्शिका सौ. अनघा मनोहर ह्यांनी तीन महिने अथक परिश्रम करून संतवाणी मुलांकडून नीट बसवून घेतली. पार्थ घोलम (ज्ञानेश्वर), पिनाक पोटे (नामदेव), अर्णव देवकुळे (तुकाराम) आयुष मसुरकर (रामदास) आणि माहिन उगळे (गाडगेबाबा) ही नाटकातली मुख्य पात्रं मुलांनी समर्थपणे सादर केली. जवळ जवळ दोन तास चाललेल्या नाटकात ओव्या, अभंग, श्लोक असं सगळं संगीतपण होतं. निखिल देवकुळेच्या मार्गदर्शनाखाली ह्या भक्तिगीतांना गोड चाली लावून मुलांनी तालासुरात गाऊन दाखवल्या आणि उपस्थित प्रेक्षकांची मनं जिंकली! संतांची वेशभूषा त्यांच्या पालकांनी अगदी उत्साहाने जमवली होती. पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री. राहुल देशमुख ह्यांनी काही वेशभूषा पुण्याहून मागवून दिल्या होत्या.

पुलंच्या काकाजी आणि आचार्यांची जुगलबंदी!

सौ. श्वेता चक्रदेव डोंगरे आणि यशोधन डोंगरे निर्मित आणि दिग्दर्शित ‘तुझे आहे तुजपाशी’ या नाटकाचा दमदार प्रयोग पिट्सबर्गला झाला. तीन अंकी नाटक, ते ही पु.लं सारख्या सिद्धहस्त लेखकाचं, हे मोठंच शिवधनुष्य त्यांच्या टिमने उचललं होतं. मग सुरू झाल्या तालमी. आधी नुसतं वाचन, मग उभं राहून, मग आता पुढच्या आठवड्यापासून अजिबात स्क्रिप्ट हातात न घेता, मग प्रॉपर्टीज्, मग संगीत, मग सेट असं एक एक पाऊल आम्ही पुढे टाकत होतो. दर आठवड्याला सगळे नवं काहीतरी शिकत होतो. आमचं जणू १००० तुकड्यांचं कोडं हळूहळू जुळू लागलं होतं. काहीतरी नवं आकार घेत होतं. पहील्या काही सरावातच आपली पात्रनिवड नेमकी झाली आहे हे जाणवलं होतं पण जसे दिवस पुढे जात होते तसे ही सगळी पात्रं इतकी समरस होऊन काम करत होती की बस. कलाकार, रंगमच व्यवस्था, नेपथ्य, संगीत, प्रकाश या सगळ्यांनी ही नाट्यसेवा मनोभावे केली आणि एक सुंदर कलाविष्कार प्रत्यक्ष उलगडत गेला.

नाटकातल्या प्रत्येकाने आपापलं काम तर चोख केलंच पण आपली अजून कशी या नाटकाला, इतर कलाकारांना मदत होईल हे देखील बघितलं. ही २० जणांची टीम एक कुटुंब होऊन वावरत होती. असं म्हणतात, theatre is a powerful medium, capable of both entertaining and enlightening. आम्ही या दोन्ही चाचण्यांमधे आम्ही उत्तीर्ण झालो असू अशी आशा आहे.

- **प्रियदर्शन मनोहर आणि श्वेता चक्रदेव डोंगरे,**
पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया

कीर्तनाचा वर्ग शनिवार, ७ जून, पासून सुरु होत आहे.
नाव नोंदणी चालू आहे:
https://bmmonline.org/kirtan/

Visiting India this Summer?
Interested in a **Cultural Tour?**
bmmonline.org/cultural-tour/

सुवर्णमहोत्सव
BMM मेळावा २०२५

3 days of Marathi Extravaganza

BMM2025 & NEOMM

Co-hosts: Pittsburgh, Columbus, Cincinnati, Buffalo, Detroit

Golden Jubilee Celebration!

June 13, 14 & 15

Only $250

Drama, Classical, Rock, Poetry, Food, Friends & Fun!

Severance Hall, Cleveland, Ohio

50 years ago, in 1975, a handful of Marathi families living in the area at that time came together and founded Northeast Ohio Marathi Mandal (NEOMM) - a non-profit 501c(3) - to celebrate the rich and ancient Marathi culture in the Northeast Ohio region. NEOMM is a proud member of Bruhan Maharashtra Mandal (BMM) - the national body of all Marathi organizations in the USA and Canada. BMM has awarded the rights to host its prestigious 2025 Maitree-Melawa event (regional convention) to NEOMM!

It's my great pleasure to invite you to this auspicious occasion! - Tanmayee Dixit, Covener

Hightlights

Star-studdeed lineup straight from Maharashtra!

Shaan - first time ever with Marathi-Hindi songs, Prashant Damle, Mahesh Kale, Sankarshan Karhade, Nihira Joshi, Salil Kulkarni, Shaunak Abhisheki, Shubhankar Kulkarni and more!

Yayati and Devayani by popular demand!

The Best of North America Talent show!

Friends and family sit together

1 adult (18+) ticket includes 1 free child ticket

Priority access to nearest hotels | Negotiated hotel rates

3 meals, 2 breakfasts, tea/coffee snack stations

Prestigious banquet dinner with artists, sponsors and donors (available for purchase)

Contact: Prasad Panwalker, BMM President (512) 294-3229, Dr. Medha Godbole, BMM EC (440) 241-3167 or your Local Mandal President

भारतीय निवास

एकमेकांचे धरुनी हात। सुखशांतीची शोधू वाट ।।
चला राहू आनंदात। आयुष्याच्या उत्तररंगात ।।

उत्तररंग या संकल्पनेचे शिल्पकार या नात्याने गेली जवळजवळ पंचवीस वर्षे माझा नवरा अशोक आणि मी अमेरिकेतील भारतीय लोकांमध्ये जनजागृती करत आलो आहोत. अमेरिकेत आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात आपले प्रश्न काय असतील, आपल्यापुढे पर्याय काय आहेत आणि आपल्या आकांक्षा काय आहेत हा त्या जनजागृतीचा सारांश आहे.

त्यातील एक महत्वाचा विषय म्हणजे राहण्याचे पर्याय. जसे वय वाढत जाते , तशी आपली ओढ आपल्या भाषा, वरणभात आणि खिचडी याकडे जाऊ लागते. ही केवळ गुजगोष्ट नाही तर ते एक शास्त्रीय सत्य आहे. अशा गरजेचे पंचवीस वर्षांपूर्वी जे भाकीत होते, ते आता सत्य झाले आहे. आपली पहिली पिढी आता सत्तरी ओलांडून पुढे गेली आहे. त्यातील काही एकल म्हणजे सिंगल होऊ लागले आहेत. काही आजारी होऊ लागले आहेत. काहींना विस्मरण प्रश्न आहेत. त्यांना स्वतंत्रपणे घरात राहून सांभाळणे कठीण होत चालले आहे. अशा वेळी भारतीय वसाहतीत राहणे हा एक उत्तम पर्याय .

दहा वर्षांपूर्वीच फ्लोरिडामध्ये भारतीयांसाठी काही वसाहती सुरु झाल्या आहेत. अन्य राज्यात सुद्धा अशा वसाहती होत आहेत.
या संदर्भात नवीन माहिती म्हणजे टेक्सास मधील डॅलसच्या भागात आता भारतीय निवास नावाची वसाहत सुरु होत आहे. मी नुकतीच या प्रकल्पाला भेट दिली. या प्रकल्पाचे संस्थापक श्री. भक्ता आणि संचालक श्री. संदीप दळवी यांचेशी गप्पा मारता मारता बऱ्याच बारकाव्यांवर चर्चा झाली.

भारतीय निवास ही पाटी एका सुंदर अकरा मजली इमारतीवर दिसते. प्रवेशद्वारातून आत दिसतो तो प्रशस्त हॉल आणि झुंबर. भिंतींवर सुंदर भारतीय रंगचित्रे पाहताना पटकन समोर दिसतो सुंदर झोपाळा. बाजूला कोर्टयार्ड म्हणजे चौसोपी मयुरी वन, आणि दुसऱ्या बाजूला दोन प्रशस्त भोजनगृहे. एक सामिष (नॉन व्हेजिटेरियन) आणि दुसरे शाकाहारी . आणि इथे भारतीय भोजनाची सोय असणार आहे. शिवाय एक कॉकटेल लाउंज, पियानो.. पुढे जात रहावे तसे दिसते एक सुंदर मंदिर आणि शेजारी छोटे चित्रपट गृह. भजन, बच्चन, भोजन, रसपान सर्वांची सोय . ठिकठिकाणी चहापान दालने आणि गप्पांसाठी आरामशीर सोफे. वरच्या मजल्यावर योगा रूम (योग कक्ष), व्यायामशाळा, सरस्वती ग्रंथालय. आणि एक मोठे कम्युनिटी किचन म्हणजे स्वयंपाकघर! आपल्याकडे वीस पंचवीस लोक जेवायला येणार असतील तर ही सोय आहे. त्याशिवाय मोठा समारंभ करायचा असेल तर एक मोठे सुसज्ज शाही सभागृह आहेच. तर तीनशेच्या वर निवास असलेली ही भारतीय जीवनशैलीची सुंदर वसाहत आहे.

या वसाहतीत स्टुडिओ पासून चार बेडरूम पर्यंत असे सुमारे सात प्रकारचे अपार्टमेंट चे आकार आणि प्रकार आहेत. व्हील चेअरची सोय असलेले बाथरूम आहे. काही खायला करावेसे वाटले तर आपले लहानसे स्वयंपाकघर आहे

गेल्या पंचवीस वर्षात उत्तररंग प्रकल्पासाठी आम्ही अमेरिकेतील पुष्कळ भागात अशा विविध प्रकारच्या वसाहती पाहिल्या. त्यासारखीच आणि त्या दर्जाची ही वसाहत आहे. आपण ज्या जीवनशैलीत आपले अमेरिकेतले सुखवस्तु आणि संपन्न जीवन घालवत आहोत, त्याच प्रतिष्ठेने आपले उत्तररंगी जीवन घालवता यावे आणि तरीही भारतीय जीवनाची अनौपचारिक, आपुलकीची किनार त्याला असावी, आता आपले घर सांभाळण्याची मोठी जबाबदारी नसावी, पण मोठ्या घरासारख्या परिसरात राहण्याचे सुख मिळावे, एकाकीपणा नसावा, भोवती मराठी, हिंदी, गुजराथी आणि अन्य भारतीय भाषा बोलणारे मित्र असावेत, रोज स्वयंपाक करण्यात वेळ जाऊ नये आणि आपले छंद जोपासण्यासाठी निवांतपणा मिळावा असे आपल्याला वाटत असेल, तर नक्कीच भारतीय निवासाची ओळख करून घ्यावी.

गेली वीस वर्षे तरी आम्ही अमेरिकेतील अनेक वसाहतींना भेटी दिल्या. या वसाहतीत इंडिपेंडंट लिव्हीग, अस्सिस्टेड लिविंग आणि नर्सिंग होम्स असे प्रकार असतात. काही वसाहतीत एका छपराखाली सर्व सोयी असतात. त्यांना continuing care retirement community असे म्हणतात. त्यांचे आर्थिक गणित साधारण सारखेच असते. बहुधा स्वतंत्र मालकी नसते.

१. एक तर पूर्ण भाड्याच्या घरात राहण्यासारखी pay as you go अशी व्यवस्था असते. किंवा

२. प्रथम काही अनामत रक्कम (deposit) भरून दरमहा काही व्यवस्थापन खर्च द्यायचा आणि अनामत रकमेचा बराच भाग आपण सोडू तेव्हा परत मिळतो, अशी व्यवस्था असते.

त्यात दिवसाला एक किंवा अधिक जेवणे (मील्स)मिळतात आणि ती घ्यावीच लागतात. भारतीय निवास ही अशीच वसाहत !

- भारतीय निवास मध्ये दिवसातून तीन आहार (मील्स) मिळतात. त्यात प्रामुख्याने भारतीय पदार्थ असतील.
- भारतीय निवासमध्ये नंतर विस्मरणग्रस्तासाठी स्वतंत्र मेमरी केअर युनिट होणार आहे. परंतु assisted living आणि नर्सिंग होम चा आत्तातरी विचार नाही.
- येथे पूर्ण भाड्याने घेणे किंवा अनामत रक्कम भरून घेणे असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.
- स्वतःचे सामान (फर्नीचर) किंवा तेही भाड्याने मिळण्याची व्यवस्था असे पर्याय आहेत.
- जादा सामान ठेवण्यास स्टोअर रूम आहेत.

अन्य राज्यातील अशा वसाहतींचे आर्थिक गणित आणि या वसाहतीचे, अशी तुलना केली तर ही वसाहत फारच चांगली आहे. या वसाहतीबद्दलची माहिती नक्कीच घ्यावी. काही चांगले शेजारी आपली वाट पहात असतील.

वसाहतीचे संकेतस्थळ : www.Bhartiyanivas.com

संपर्क: २१४ ८३८ ७७५०

पत्ता:7750 Lindon B Jonson FWY, Dallas TX 75251

\- **विद्या हर्डीकर-सप्रे**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

राशिभविष्य : जून २०२५
“या महिन्यात राहू कुंभेत व शनि मीनेत असल्यामुळे कुणाचा लाभ तर कुणाला त्रास होणार हे जाणून घेऊ"."
अजय तनखीवाले
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

Learn something new this Summer through our Summer Mentorship Program
https://bmmonline.org/yuwa/

Cricket Summer Camp at Rohit Sharma Academy
One-week camp in the Dallas area
https://bmmonline.org/sports/

Visiting India this Summer?
Want to do an **Internship** over there?
https://bmmonline.org/bconnect/

In partnership with BMM
NAFA FILM FESTIVAL
AMERICA'S OFFICIAL MARATHI FILM FESTIVAL
JULY 26 & 27 2025 CALIFORNIA THEATER SAN JOSE CA
MARATHI CINEMA AMERICAN DREAM
Film Premieres
Masterclasses
Meet n' Greets
Panel Discussions
Short Films Submissions
Membership
Group Bookings

BMM
Reshimgathee
नाते जुळते मनाशी मनाचे
Summer Soirée for Eligible Singles
July 12, 2025 5:00 pm-10:00pm
At Forsgate Country Club 375 Forsgate Dr, Monroe Township, NJ 08831
Cocktail Hour & Ice Breakers
Speed Dating
Dinner
Music & Dancing
Members $175
Non Member $185
SCAN ME
Contact : reshimgathee@bmmonline.org



BMM
Reshimgathee
A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America
नाते जुळते मनाशी मनाचे
Find Your Perfect Match Within Our Community
reshimgathee.bmmonline.org/

जागतिक पर्यावरण दिवस

"प्लॅस्टिक प्रदूषणासाठी लढा" ही थीम यावेळच्या नेहमी ५ जून रोजी असणाऱ्या जागतिक पर्यावरण दिवसाची आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस सुरू केला. १९७४ साली सुरू झालेल्या या दिवशी अनेक ठिकाणी वेगवेगळे कार्यक्रम होऊन हा दिवस "साजरा" केला जातो. ह्या थीमवरची चित्र काढून, पोस्टर्स चिकटवून, निबंध लिहून, भाषणं करून हा दिवस "साजरा" होईल कि प्रत्यक्ष कृती करून? अर्थातच कृती करून! पण मग ती कृती करायची कोणी? अर्थातच तुम्ही.. आम्ही, सर्वांनी! पण खरंच? आपण, स्वतःला सुशिक्षित म्हणवणारे तरी, खरंच? करतो का कृती?

"पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मी वैयक्तिकरित्या कृती करेन. माझ्या कृतींमुळे कोणतीही प्रजाती धोक्यात येऊ नये किंवा नष्ट होऊ नये म्हणून मी आपल्या नैसर्गिक पर्यावरणाचा, शाश्वत वापर करण्याचा प्रयत्न करेन." ही पर्यावरणाची खरी प्रतिज्ञा आहे. आजच्या काळाची ही मोठी गरज आहे.

झाडं लावा, पाणी, वीज जपून वापरा, इंधन फुकट घालवू नका, अन्नाची नासाडी करू नका, परिसर स्वच्छ ठेवा ... ह्या बाबतीत अनेक जण जाणीवपूर्वक प्रयत्न करतही असतील. पण जे ही आपली जबाबदारी समजत नाहीत, ज्यांच्याजवळ वेळ नाही, पण पैसा भरपूर आहे, आणि जे अगदी अशिक्षित आहेत असा वर्ग समाजात खूप मोठा आहे आणि त्यामुळेच कदाचित असे दिवस "साजरे" करायला लागत असावेत.

नेचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासानुमते भारत प्लॅस्टिक प्रदूषणात सर्वात मोठा योगदान देणारा देश बनल्याचे समोर आले आहे. जगात निर्माण होणाऱ्या प्लॅस्टिक कचऱ्यापैकी एक पंचमांश कचरा फक्त भारतात निर्माण होतो ही धक्कादायक बातमी यातून उघड झाली आहे. दरवर्षी भारतात ९३ कोटी टन इतका प्लॅस्टिक कचरा निर्माण होतो. प्लॅस्टिकचा कचरा रस्त्यावर पाहिला, समुद्रातून काढलेला पाहिला, काही गुरांच्या पोटातून काढलेल्या प्लस्टिकच्या पिशव्या पाहिल्या की अंगावर काटा येतो.

ह्या प्लॅस्टिकनी किती अलगदपणे आपल्याला जाळ्यात अडकवले आहे! टिकावू म्हणून आले आपल्या घरात आणि आता नाकापेक्षा मोती जड झाला आहे अशी परिस्थिती झाली आहे. आमच्या लहानपणी कधी बरे प्रथम प्लॅस्टिक आले घरात? आठवत नाही. कदाचित ६५ सालानंतर? आधी सगळी भांडीकुंडी पितळेची होती, स्टीलची होती, पिशव्या कापडाच्या होत्या. स्वयंपाकघरात उघड्या फळ्यांवर पितळेचे डबे उंचीप्रमाणे मांडलेले असायचे. पेले, वाट्या डाव सर्वच पितळेचे! किती छान दिसायचे! मग हळू हळू स्टिल आले. नंतर आलेल्या प्लॅस्टिकने सर्वांनाच भुरळ घातली. ते वजनाला हलके, पारदर्शक किंवा आकर्षक रंग, त्यात स्वस्त! पटापट वस्तू घरात यायला लागल्या. लहानपणी एक साबणाचा चूरा असलेली मोठी प्लॅस्टिकची बरणी आमच्या घरात होती असे आठवतेय. साबण संपल्यावर कित्येक वर्ष त्यात तांदूळ भरून ठेवत होतो आम्ही. आधी अशा प्रकारे वस्तू आल्या. मग मात्र हळू हळू पितळी जड भांडी माळ्यावर गेली.

सगळे वाणी सामान आधी सुटे, कागदाच्या पिशवीतून मिळायचे. दूध गोठ्यातले ....तांब्यातून आणायचे, मग काचेच्या बाटलीतून, आणि मग प्लॅस्टिकच्या पिशवीतूनच मिळायला लागले. त्यात आले डबे, कुकर, प्लेट्स, चमचे वगैरे मायक्रोव्हेव आणि डिश वॉशर सेफ .....सर्व सोईचे वाटायला लागले.....कापडी पिशव्या पण घरातून जणू गायब झाल्या... आणि त्या नंतर प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा महापूर सर्वत्र आढळायला लागला.

आम्ही मैत्रिणी काही वर्षांपूर्वी कापडी पिशव्या शिवून घेऊन, प्लॅस्टिक पिशव्या वापरू नका म्हणून प्रसार करत होतो. काही दिवस सर्व प्लॅस्टिकच्या पिशव्या बंद होत्या. भाजीवाल्याकडे पण प्लॅस्टिकची पिशवी मिळेनाशी झाली.... पण परत ये रे माझ्या मागल्या! काही तरी पळवाटा व्यापारी, कारखानदार काढतात. सरकार पण पूर्ण बंदी आणत नाही आणि परत प्लॅस्टिकच्या पिशव्या आपल्या हजर..! आपण त्या विळख्यातून बाहेरच येत नाही. आता त्या प्लॅस्टिकचा परत वापर करून कोणी फर्निचर बनवतो, कोणी घरं, कोणी रस्ते... प्लास्टिक चा आकार, उपयोग बदलतो पण प्लॅस्टिक नष्ट होत नाहीच.

एकदा मी सकाळी उठल्यापासून माझ्या घरातले प्लॅस्टिक मोजायचा प्रयत्न केला. सकाळी उठल्यावर पहिला प्लॅस्टीकचा टूथब्रश हातात मग चहा करताना तर चहा-साखरेच्याच काय, कपाटातल्या सगळ्याच कौतुकाने सारख्या घेतलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या मला वेडावतांना दिसल्या. चहा गाळायची गाळणी, भांडी धुवायची घासणी प्लॅस्टिकची, साबणाची बाटली प्लॅस्टिकची, आंघोळ करायची बादली, मग प्लॅस्टिकचे, गॅलरीत झांडांना पाणी घालायला गेले तर कुंड्या प्लॅस्टिकच्या, पाण्याचा फवारा मारायला फवारणी प्लॅस्टिकची, तिथला केर काढायची केरसुणी प्लॅस्टिकची, सुपडं प्लॅस्टिकचे, कचरेवाल्याला कचरा द्यायला गेले तो डबा प्लॅस्टिकचा, पाणी प्यायला फ्रिज उघडला तर बाटल्या प्लॅस्टिकच्या, भाजीचा कप्पा उघडला तर प्लॅस्टिकचे ट्रे, भाजी धुवायला चाळणी प्लॅस्टिकची, कोशिंबीर

करायला किसणी घेतली ती प्लॅस्टिकची, खवलेलं खोबरे फ्रिजमधून घेतलं तो डबा प्लास्टिकचा.

सकाळच्या तासाभरातच इतकं प्लास्टिक अंगावर आलं की जीव घाबरा घुबरा झाला. मी इतर गोष्टी मग पहायचं सोडून दिलं. सणक येऊन एक दिवस सगळ्या ह्या गोष्टी गोळा केल्या, भंगारवाल्याला दिल्या, स्टिलचे डबे, काचेच्या बाटल्या, सगळ्या आधीच्या अडगळीत पडलेल्या गोष्टी परत वापरायला काढल्या. प्लास्टिक कटाक्षाने टाळायला लागले. पण तरी बाहेरून येणारे वाण्याकडचे सामान, पॅकिंगच्या पिशव्या यांचा ढीग कमी करताच येत नाहीये. कुठे आणि कसं आवरायचं ह्या प्लॅस्टिकला? खरंच गहन प्रश्न आहे ना? तुम्ही काय करता? तुमचे घर प्लास्टिक मुक्त आहे का?... पर्यावरणासाठी प्लॅस्टिक वापरणे लगेच बंद करता नाही आले तरी कमीत कमी प्रमाणात वापर करणे आपल्या हातात आहे, आणि आपण सर्वांनीच या चळवळीत भाग घेणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

- चित्रा जुवेकर मेहेंदळे, सिएटल, वॉशिंग्टन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

मराठीचे दक्षिणायन

मराठी घरात खूप वर्षांपासून चिमुकल्यांना आपण — 'अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं, रुप्याचा वाळा तान्ह्या बाळा तीट लावा' ही ओळ ऐकवत आलो आहोत. पण तुम्हाला माहिती आहे का की ह्यातले अडगुलं, मडगुलं, कडगुलं हे शब्द आपण तामिळ भाषेतून घेतले आहेत? एवढंच कशाला, आपण सदोदित 'मराठमोळी संस्कृती' म्हणून मिरवत असतो त्यातला 'मोळी' हा शब्द सुद्धा तामिळ आहे आणि मोळी म्हणजे बोली.

मराठीची द्राविडी भाषांबरोबरची ही देवाणघेवाण हजारो वर्षांपासून सुरु आहे. ह्या भाषिक घुसळणीचा मराठीला फायदाच झाला आहे. आज आपण तामिळ, तेलुगू व कन्नड भाषांमधून मराठीने आत्मसात केलेल्या शब्दांबरोबर इतिहासातल्या काही मनोरंजक गोष्टी बघूया.

ह्या सर्व दक्षिणेकडच्या भाषा ह्या द्राविडी भाषा समूहातील आहेत. मराठी ही इंडो-आर्यन भाषासमूहातली भाषा म्हणून ओळखली जाते. पण भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र हा ह्या राज्यांना सर्वात जवळचा असल्याने इथल्या भाषा वेगवेगळ्या असल्या तरी संस्कृती आणि रितीरिवाजांमध्ये खूप समानता दिसून येते. गुढीपाडवा हा सण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण, आंध्र प्रदेश आणि गोवा ह्या राज्यांत साजरा केला जातो. बहामनी साम्राज्याच्या पूर्वी सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, वाकाटक आणि यादव अशा विविध राजघराण्यांची इथल्या विस्तृत प्रदेशावर नर्मदेपासून, कृष्णा, गोदावरी, कावेरीपर्यंत सत्ता पसरलेली होती. त्याचाच परिणाम ह्या सांस्कृतिक अभिसरणातून दिसून येतो. हा प्रदेश केवळ हिंदूच नाही तर जैन, बौद्ध अशा धर्मांची व नाथ, महानुभाव, वारकरी, भागवत, दत्त, रामदासी, वीरशैव आणि लिंगायत अशा पंथांची भूमी म्हणून प्रसिद्ध आहे.

बायकांच्या रोजच्या बोलण्यातले अय्या, इश्श तसंच चिल्लीपिल्ली, पिल्लू हे छोट्यांचे शब्द तामिळमधून आले आहेत. कडाप्पा ह्या प्रकारचा दगड पूर्वीपासून स्वयंपाकघरात वापरला जातो. ह्याच नावाचं आंध्र प्रदेशात एक शहर आहे. तिथून आलेले बरेच लोक पूर्वीपासून बांधकाम व्यवसायात काम करत आहेत. त्यांच्या तेलुगू भाषेतून तांडेल, वेठबिगार, डबी, टाळा (कुलुप), किडूकमिडूक, टेंगुळ, गदारोळ असे शब्द मराठीत आले आहेत.

आता मराठीच्या दृष्टीने सगळ्यांत प्रभावशाली अशा कन्नड ह्या द्राविडी भाषेकडे वळूया. मराठी-कन्नड अनुबंध हा केवळ सीमा प्रदेशापुरता मर्यादित नाही. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे — कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु. असं म्हटलं जातं की महाराष्ट्राचं आराध्य दैवत — विठ्ठल — हाच मुळी कर्नाटकातून आला आहे. आजही कर्नाटकातले हजारो वारकरी पंढरपूरची वारी करतात. तुळजाभवानी आणि अंबाबाईचे मोठ्या प्रमाणावर भक्त कर्नाटकातले आहेत. तसच कर्नाटकातल्या गाणगापूर ह्या दत्तात्रयाच्या तीर्थक्षेत्री आणि सौंदत्ती येथील यल्लमा देवीच्या म्हणजेच रेणुकामातेच्या दर्शनाला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर भक्तमंडळी जात असतात. तेच जेजुरीच्या खंडेरायाचं. 'येळकोट येळकोट जय मल्हार' ह्या त्याच्या जयघोषातला येळकोट हा शब्द कानडी. खंडेरायाचं ७ कोटी सैन्य होतं असं मानलं जातं. नवीन वर्षाची आपण जी गुढी उभारतो तो गुढी हा शब्दसुद्धा तिथलाच.

कर्नाटकातील ऐहोळे येथील दुसरा पुलकेशी ह्या चालुक्य राजाने ७व्या शतकात बांधलेल्या मेगुती जैन मंदिरात संस्कृत भाषेतला एक शिलालेख आहे. त्यात 'महाराष्ट्र' असा आतापर्यंत सापडलेला सर्वात प्राचीन उल्लेख सापडतो. बदामी येथील चालुक्य राजांचे महाराष्ट्राच्या मोठ्या भूभागावर राज्य होते. दक्षिण कर्नाटकातील श्रवणबेळगोळ ह्या जैन धर्मियांच्या तीर्थक्षेत्री दहाव्या शतकातील

भगवान बाहुबलीची ५८ फूट मूर्ती आहे. तिच्या उजव्या पायाशी 'श्री चामुंडराये करवियले गंगाजे सुत्ताले करवियले' असं मराठीत कोरलेलं आढळतं. मराठीच्या इतिहासासंबंधी हा एक महत्त्वाचा दुवा मानला जातो जो कर्नाटकात आढळून येतो. हे काहीसं आश्चर्यकारक आहे कारण हा प्रदेश त्यावेळच्या मराठी भाषिक प्रदेशापासून खूप दूर आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जैन धर्मीय मोठ्या प्रमाणात इतक्या दूर प्रवास करत असले पाहिजेत हे सिद्ध होतं.

बाराव्या शतकातील लिंगायत समाज सुधारक बसवेश्वर ह्यांनी कानडीतल्या वचन साहित्य निर्मितीत मोठा हातभार लावला आहे. ते महाराष्ट्रातल्या लिंगायत समाजातही खूप लोकप्रिय आहेत. तसंच सोलापुरातल्या सिद्धेश्वर मंदिराला कर्नाटकातले लिंगायत समाजातले भाविक मोठ्या प्रमाणात भेट देतात.

आपल्याकडे मराठीत जेव्हा १३ व्या शतकापासून पुढची ४०० वर्षे संत साहित्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली त्याच कालखंडात कानडीमध्ये दास साहित्याची निर्मिती झाली. पुरंदरदास ज्यांनी कर्नाटकी संगीताचा पाय रचला ते स्वतःला विठ्ठलाचे दास म्हणवत. त्यांनी ज्ञानेश्वरांच्या काही ओव्यांचं कानडीत भाषांतर केलं आहे. संगीतातला हा सुंदर मिलाफ केवळ शास्त्रीय संगीतापुरता न रहाता तो भजन, कीर्तन ह्या मराठी रूपांतून भक्तिसंगीतात आणि नाट्यसंगीतातही दिसून येतो. मल्लिकार्जुन मन्सूर, भीमसेन जोशी, बसवराज राजगुरू, कुमार गंधर्व आणि गंगुबाई हंगल ह्या सुप्रसिद्ध कानडी कलाकारांनी हिंदुस्थानी संगीताची खूप मोठी सेवा केली आहे. असं म्हटलं जायचं की कानडी लोकांकडे चांगला गळा असेल तर मराठी लोकांकडे चांगले कान होते.

खाद्य संस्कृतीविषयी बोलताना पुढील शब्दांवर नजर टाकूया — लाडू, कडबू, गूळ, खोबरे, घारगे, कोथिंबीर, कोशिंबीर, सार, सुपारी, उत्तपा, दोसा, उडीद, लवंग, दोडका, भाकरी, तूप, शेवया, पापड, खलबत्ता, ओगराळे, हंडा, अडकित्ता, कोयता, विळी, घंगाळ, ताट, चिमटी, पूड, पिशवी. जणू काही कानडी शब्दांनी स्वयंपाकघराचा ताबाच घेतला आहे.

कानडीने मराठीला वेगवेगळ्या प्रकारची गती दिली आहे. कशी ते पुढील शब्दांवरून कळेल — लटपट, लगबग, चटकन, झटकन, गडबड, लगोलग, मुळूमुळू, बकाबक, मुरड, मुरकी, रिंगण. हे सर्व कानडीतून आले आहेत. नात्यासंबंधी शब्द तर आपल्या अगदी जवळचे आहेत. त्यासाठी फार इकडे-तिकडे करायची जरूर नाही. तुमच्या लक्षात आलंच असेल की इकडे-तिकडे हे तिकडून आपल्याकडे आले आहेत. नाते विषयक शब्द — आजा, अप्पा, अण्णा, अक्का, मामा, काका.

आता बांधकाम विषयक काही शब्द बघूया — माडी, छप्पर, ओवरी, चौक, चौकट, मोट, दाभण, चिरगुट, बांबू, किल्ली, मेण.

मराठीने स्वीकारलेले आणखी काही शब्द बघूया — शेंदूर, सोंड, हूल, कुरळे, हुच्च, सवड, लठ्ठ, पक्का, कोरडा, गडद, काकडा, रट्टा, मेणा, मुंडू, कीड, चहाडी, चंबू, चेंडू, चड्डी, गवळी, गवसणी, तंटा, डोंगर, डंका, डांगोरा, ठाव, ठक, बोका, बोचके, चिल्लर, मेंदू, झोप, वेड, नाचक्की, कांबळे, बांगडी, शिंपी, झुरळ, टाळू, गोंडा, नेमणूक, बडिवार. अशा अजून भरपूर शब्दांनी मराठी समृद्ध झाली आहे.

बेळगाव, धारवाड, निपाणी, विजापूर, सोलापूर, सांगली, मिरज ह्या सीमा प्रदेशात दोन संस्कृतींमधली गुंफण प्रकर्षाने जाणवते. बेळगावचे मांडे आणि कुंदा जसा महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे तसेच हेल काढून कानडी धाटणीचं बेळगावी मराठी बोलणारं पात्र बऱ्याच मराठी नाटक-सिनेमांमधून लोकप्रिय झालेलं आहे.

संत तुकारामांचा एक अभंग आहे — कानडीने केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचे उत्तर एका न ये ॥ तैसे मज नको करू कमळापति । देई या संगति सज्जनांची ॥ ह्यातला कानडी भाषिक स्त्री व तिच्या मराठी नवऱ्याच्या विसंगतीचा गंमतीचा भाग सोडला तर खरोखरच असंख्य मराठी-कानडी कुटुंबातून खूप काळापासून रोजीरोटी संबंध प्रस्थापित झालेले बघायला मिळतात.

शंकर बालदीक्षित जोशी हे एक कानडी विद्वान व इतिहास संशोधक बेळगाव जिल्ह्यातले होते. त्यांची स्वतःची मातृभाषा मराठी होती. त्यांनी महाराष्ट्राच्या इतिहासावरही काही लेखन केलं आहे. त्यांच्या मते खूप पूर्वी हट्टी समाजाचे कानडी लोकं नर्मदे पर्यंत पसरले होते. त्यांच्यावरूनच मराठीचं पूर्वीचं नाव मरहट्टी हे रूढ झालं. ते असंही म्हणतात की ज्ञानेश्वरीतही खूप कानडी शब्द आढळून येतात.

एकंदरीत मराठीचा हा द्राविडी प्रयास मराठीच्या पथ्यावरच पडला आहे. मराठी ही इतकी रसाळ आणि प्रगल्भ भाषा म्हणून उदयास येण्यात इतर भारतीय भाषांचाही हातभार लागला आहे. मराठी-कानडी इतका सलोखा भारतातल्या दुसऱ्या राज्यांच्या बाबतीत क्वचितच आढळून येतो. मराठीचे हे दक्षिणायन ही आपल्यासाठी नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे.

- **अमित भावे**, गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

कचरा - एक संजीवन



शाल्मली उन्हाळ्याच्या सुट्टीत घरी यायला निघाली होती. यावेळी सुट्टीत घरी काय काय करायचे, कोण कोणाला भेटायचे, आजी आजोबांकडे राहायला कधी जायचे असे एक ना दोन असंख्य गोष्टींचे बेत आखणे चालले होते. घरी यायच्या काही दिवस अगोदरच शाल्मलीने एक उपक्रम पूर्ण केला होता. विविध गोष्टीचे recycling आणि upcycling कसे करायचे आणि त्यातून आर्थिक उत्पन्न कसे निर्माण करायचे हे तिच्या अभियांत्रिकी शिक्षणा बरोबर ती असे व्यावसायिक शिक्षण नेहमीच करायची. पण या वेळी ती फारच प्रभावित झाली होती आणि तिला कधी एकदा आजी आजोबांना जाऊन सगळे सांगते असे झाले होते. आजी-आजोबा आणि नात यांचे नाते असेच खास होते. आजी आजोबा निवृत्त होण्या अगोदर प्राध्यापक होते. नेहमीच वेगवेगळ्या विषयांवर, अभ्यास पर परीसंवाद मध्ये भाग घ्यायचे म्हणून समाजात त्यांना खासच प्रतिष्ठा होती. त्यांच्या या ज्ञानाने शाल्मली लहानपणा पासूनच प्रभावित झाली होती आणि त्यांच्याच मार्गपथावर चालण्याचा प्रयत्न करत होती.

दारात पाऊल ठेवल्या ठेवल्या 'आई आले मी' म्हणत शाल्मली घरात जाऊन आईच्या गळ्यात पडली. तेव्हा तिच्या आवडीच्या तिखटमिठाच्या पुऱ्या करण्यात शाल्मलीची आई दंग होती. आई म्हणाली, 'हो हो अगं जरा हळू, तुझ्यासाठीच पुऱ्या करत होते. संध्याकाळी पर्यंत येणार होतीस नां'? शाल्मली म्हणाली, 'सकाळी लवकरच उठले तर लगेचच यायला निघाले आणि आई कालच माझा recycling आणि upcycling चा course पूर्ण झाला. खुपच छान माहिती मिळाली. त्यावेळी तुझी आणि आजीची खूपच आठवण आली'. त्यावर आई म्हणाली, 'आजी कालच आली आहे. तिने नवीन रोपे आणली होती ती लावत आहे आणि आजोबा पण आले आहेत. त्यांच्या खोलीत वाचत बसले असतील'. 'अरे वा', म्हणतच शाल्मली मागे अंगणात आजीला भेटायला गेली. आई म्हणालीच, 'आता तासा दोन तासाची निश्चिती, दोघिही छान झोपाळयावर बसून गप्पा मारत बसणार', आणि झालेही तसेच. शाल्मली आजीकडे जात होती त्यावेळेसच आजी रोपे लावून घरात येत होती. शाल्मलीला पाहून आजी तशीच उभी राहिली. मग आई म्हणल्याप्रमाणे दोघीही झोपाळ्यावर विराजमान झाल्या, नेहमी प्रमाणे एकमेकींची विचारपूस झाली. तेवढ्यात अगदी आठवल्या प्रमाणे शाल्मलीने तिच्या नविन उपक्रमाबद्दल सांगायला सुरवात केली. 'Upcycle म्हणजेच नवीन रूप देणारा पुनर्वापर. जुन्या वस्तु, कपडे, लाकूड, कागद, प्लास्टिक इत्यादी गोष्टींचा वापर करून त्यांना नवीन रूप देणे. यामध्ये या जुन्या वस्तुचे मुल्य वाढते. यामुळे निश्चितच कचरा कमी होतो. स्थानिक कलाकारी, हस्तकलेला प्रोत्साहन पण मिळते. पर्यावरणाला पोषक अशी जीवनशैली तयार होते. तुझ्या भाषेत सांगायचे झाले तर 'कचऱ्यातून कला', 'टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू'. आजी म्हणाली, 'पण काय काय होते यातून'. पुढे शाल्मलीने सांगायला सुरवात केली, 'जुन्या जीन्स पासून बॅग, वर्तमानपत्राचा कागद वापरून त्याच्या कागदाच्या नळ्या तयार करून मग पुठ्ठ्याच्या Box च्या बाजूला लावून त्याचा flower pot तयार करायचा. जुन्या कपडयांचे लांब लांब तुकडे करून त्याच्या वेण्या घालायच्या मग त्यांची वेटोळे करून प्रत्येक वेटोळे एकमेकांना जोडण्यासाठी शिवायचे. अश्या तऱ्हेने पायपुसणी तयार करायची. यात हस्तकलेला पण प्रोत्साहन'. आजी सगळे नीट मन लावून ऐकत होती. मग मध्येच म्हणाली, 'अगं हे आम्ही, आमची आई, आजी नेहमीच करायचो. आपल्या गोधड्या, लहान मुलांची दुपटी शिवायचो हे असेच काहीसे दिसत आहे. तुला माहिती आहे कां माझी आई पुड्याचा दोरा असतो ना, अग असं काय बघते आहेस. पूर्वी वाण्याच्या दुकानात प्रत्येक गोष्ट कागदात पुड्याच्या दोऱ्याने बांधून द्यायचे. तर तो पुडयाचा दोरा माझी आई ठेवून द्यायची. त्याच दोऱ्याने क्रोशीयाच्या सुईने रुमाल विणायची. तू माझ्या घरी रेडियोवर घातलेला रुमाल पहिला आहेस ना, तो आईने विणलेला आहे. त्यावेळी पुड्याचा दोरा असला तरी चांगला बळकट असायचा तर अजून छान टिकून आहे'.

शाल्मलीची आई तिचे सगळे काम आवरून दोघींसाठी ताज्या ताज्या केलेल्या पुऱ्या घेऊन मागच्या अंगणात आली. आजी म्हणालीस, 'अगं, आम्ही येतो ना आत'. तेव्हा शाल्मलीची आई हसत म्हणाली, 'एवढ्या छान गप्पा रंगल्या आहेत तर इतक्यात आत कुठे येत आहात. आता इथेच खा'. शाल्मलीने पहिला घास तोंडात टाकल्यावर 'वा' म्हणून तिने आईला दाद दिली. तेवढ्यातच तिच्या लक्षात आले की आईने स्वतः साठी आणलेच नाही तर दुसरा घास शाल्मलीने आईलाच भरवला. मग परत तिघींच्या गप्पा सुरु झाल्या. आईच्या कानावर काम करता करता थोडे फार ऐकू येत होते पण तिने विचारले, 'काय गं, शाल्मली काय एवढे सांगत आहेस'. मग काय, परत उजळणी झाली. त्यावर आई उत्साहाने म्हणाली, 'शाल्मली, अगं परवा मी पण एक छान प्रकार करून बघितला. मोठ्या भांड्यात पाणी घेऊन त्यात रंगकाम, चित्रकाम करतो ते रंग घालायचे. मग कोणताही कागद घेतला तर तो पाण्यातून काढायचा, मग त्याने वेगवेगळ्या रंगांचे

डिझाईन wavy style मध्ये असा रंगीत कागद तयार होतो. तो भेटवस्तू गुंडाळण्यासाठी वापरता येऊ शकतो'. यावर आजीने, शाल्मलीने 'कधी केलास, कुठे ठेवला आहे' म्हणत एकदम प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. आई म्हणाली, 'अगं, मागच्या आठवड्यात TV वरच्या एका कार्यक्रमात पाहिले आणि मग करून बघितले. शाल्मली तुझ्याच खोलीत तो रंगीत कागद ठेवला आहे'.

या तिघींची गप्पांची मैफिल छानच रंगात आली होती आणि तेवढ्यात आजोबा त्यांना शोधत शोधत बाहेर आले आणि म्हणाले, 'काय चालले आहे, काय एवढ्या गप्पा चालल्या आहेत'. आजी म्हणाली, 'मी जे गोधड्या करायची त्याचीच छान रुपांतरीत बाजू शाल्मलीने मला सांगितली आणि त्याबद्दल शिकून पण आली आहे'. आजीचे बोलणे संपत नाही तोवर शाल्मली म्हणाली, 'आजोबा Sustainability through recycling and upcycling या बद्दल शिकले आणि त्यातून आर्थिक उत्पन्न कसे करता येईल हे पण सांगितले'.

आजोबा त्यावर म्हणाले, 'अगदी या महिन्यातल्या पर्यावरणाच्या दिवसाला साजेशीच शिकवण घेतली आहेस, छान!' पुढे म्हणाले, 'शाल्मली ह्या वर्षापासून आमच्या कॉलेज मध्ये "Zero Waste Systems and Sustainable Practices" हा विषय घोषित केला आहे आणि त्याच्या प्रसारासाठी मी एक कार्यशाळा घेणार आहे. आता तू इथे आहेस तर तुझे तुझ्या शिक्षणातले अनुभव, तुझे त्यावरचे विचार सांगशिल का? मुलांना समजवायला मदतच होईल'. शाल्मली तात्कालच म्हणाली, 'आजोबा तुमच्या बरोबर काम करणे म्हणजे माझ्यासाठी पर्वणीच आहे. हो, नक्कीच मी सांगेन आणि आजोबा ५ जून ला पर्यावरणाचा दिवस आहे तर त्या दिवशीच तुमची कार्यशाळा घेता येईल का? या दिवसाचे महत्व छान तऱ्हेने समजून सांगता येईल'. मग काय आजोबाही खूष आणि नात ही खूष.

आई आणि आजी, ह्या दोघांचे संभाषण प्रेमळपणे ऐकत होत्या. मग हसून म्हणतात कश्या, 'पर्यावरणाचा समतोल साधताय हे चांगलेच आहे, आता जरा आपल्याच घरातल्या गोष्टींचे बघा, कशाचे काय करता येईल म्हणजे त्या बरोबर घर पण साफ होईल'! त्यावर सगळेच हसत घरात गेले.

उत्तरा भालेराव, टॅम्पा, फ्लोरिडा

गुरुपीठ

"गुरुपीठ" या उपक्रमातर्फे उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी प्राध्यापकांना एकत्र आणण्याचा उद्देश आहे. यात प्रामुख्याने प्राध्यापकांना एकमेकांच्या ओळखी वाढवून स्वतःच्या नोकरी / संशोधनासाठी चांगली संधी शोधण्याचा, तसेच उच्च शिक्षणासाठी प्रयत्न करत असलेल्या मराठी विद्यार्थ्यांना, त्यांना हवे असलेल्या विषयात संशोधन करणाऱ्या प्राध्यापकांची ओळख करून घेण्याची संधी आहे.

या उपक्रमातर्फे आपण खालील कार्यक्रम करू शकतो:

- मराठी विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मराठी प्राध्यापक उपलब्ध असलेल्या विद्यापीठांबद्दल माहिती मिळेल.

- मराठी पीएचडी विद्यार्थ्याला एखाद्या विद्यापीठात नोकरीची संधी उपलब्ध असेल तर ती कळू शकेल.

- खूपच प्रसिद्ध असलेल्या विद्यापीठांमधील प्राध्यापक त्यांच्या विद्यापीठात प्रवेश मिळवण्यासाठीचे प्रशिक्षण देणारे वर्ग बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे घेऊ शकतील - याचा फायदा उत्तर अमेरिकेतील नवीन पिढीतील मराठी मुलांना होऊ शकतो.

- दोन विद्यापीठांमध्ये एकत्रित संशोधन करण्यासंदर्भात सामंजस्य करार (MoU) होऊ शकतो.

- विशेष अनुदानासाठी उद्योगसमूहांशी कसे जोडले जावे याबद्दल वरिष्ठ प्राध्यापक कार्यशाळा (workshop) घेऊ शकतात.

- वरिष्ठ प्राध्यापक नवीन प्राध्यापकांना अध्यापनाच्या क्षेत्रात अत्यंत आवश्यक असलेल्या काही कौशल्यांचे प्रशिक्षण देऊ शकतात.

- महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाबरोबर कोणताही सामंजस्य करार (MoU) करायचा असेल तर त्या दृष्टीने पावले टाकता येतील.

- भारतातील विद्यार्थी उत्तर अमेरिकेतील विद्यापीठात उन्हाळ्याच्या सुट्टीत एखादा अभ्यासक्रम करायला येऊ शकतील, तसेच अमेरिकेतील विद्यार्थी भारतीय विद्यापीठात उन्हाळ्याच्या सुट्टीत अभ्यासाला जाऊ शकतील.

- उत्तर अमेरिकेतील प्राध्यापक भारतीय विद्यापीठात Guest Lecturer म्हणून एक-दोन आठवडे किंवा एक ते तीन महिने अशा कालखंडासाठी जाऊ शकतील.

२०२६ ला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सियाटल येथील संमेलनाच्या वेळी शैक्षणिक शिखर परिषदे मार्फत (Educational Summit) महाराष्ट्रातील तसेच उत्तर अमेरिकेतील मराठी प्राध्यापकांना एकत्र आणता येईल.

त्या वेळी तिथे कोणत्या चर्चासत्रांचे आयोजन करायचे या संदर्भात चर्चा करता येईल. तसेच, त्या शिखर परिषदेमध्ये भारतातील नामांकित विद्यापीठे जर उत्तर अमेरिकेतील विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार करू शकले तर शैक्षणिक / बौद्धिक देवाण-घेवाण होण्यासही मदत होईल.

जर तुमच्या परिचयात कोणी मराठी प्राध्यापक असतील तर कृपया हा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवा आणि त्यांना खाली दिलेल्या लिंक वर त्यांची माहिती भरायला सांगा. त्यांच्या संमतीने आम्ही आवश्यक ती माहिती बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करू.

https://forms.gle/xBJbUGJRBfrh7G8Q9

("गुरुपीठ" या उपक्रमाचे बोधचिन्ह श्री. अमोल महाजन यांनी साकारले आहे)

आठवणीतले वास

"तदबीर से बिगड़ी हुई, तक़्दीर बना ले तक़्दीर बना ले
अपने पे भरोसा है, तो एक दाँव लगा ले
क्या ख़ाक वो जीना है जो अपने ही लिए हो
ख़ुद मिटके किसी और को मिटने से बचा ले,
अपने पे भरोसा है तो एक दाँव लगा ले, लगा ले, दाँव लगा ले "

तुला आठवते अश्या प्रकारे रोज आपला डोळा उघडायचा? अश्याच कुठल्यातरी गाण्याने आपली सकाळ चालू व्हायची. जाग यायची ते आकाशवाणीवर वाजणारी ही अशी गाणी ऐकतच ना? तेव्हा आपण ही गाणी फक्त म्हणायचो, पण आज हीच गाणी अर्थपूर्ण गातो :) रोज बदलणाऱ्या ह्या गजराची सवय मला अजूनही आहे, मग काय आता मीच वेगवेगळी गाणी म्हणते.

.... आणि ह्या आवाजाबरोबर एकीकडे भांड्यांचे आवाज आणि त्यात खमखमीत अश्या फोडणीचा वास आणि मध्येच आईची हाक - "उठलात का?" अंघोळ करून आपण बाहेर येऊन कायम आईला पहिला प्रश्न हाच विचारायचो आज कुठली भाजी आहे गं, जरका त्या भाजीच्या नावाच्या आधी भरपूर विशेषणं वापरली गेली तर समजून जायचं की आज आपली नावडती भाजी आहे दुधी भोपळ्यासारखी वगैरे. आणि त्या भाजीचा उगाच वास घेऊन तोंड करत, एवढुसा चेहरा घेऊन शाळेत जायचो. खरंतर सगळ्या भाज्यांना एकसारखाच वास. आपण फक्त आपली नाराजगी दाखवण्याचा हा एक मार्ग शोधला होता. मग शाळेतून जसे आपण दोघेजण घरी यायचो जिन्यातच कूकरच्या शिटी आवाज यायचा. रोज दुपारी ३/३.३० वाजता वाफाळता वरण भात, त्यावर तुपाची धार आणि लिंबाचं लोणचं - आहाहाहा आजही त्याचा वास मनात दरवळतो. त्यानंतर आई आणि तुझी जी जुगलबंदी चालू व्हायची ते थेट तुला खालून तुझी टोळी हाक मारायची अगदी, तोपर्यंत. तू पण म्हणा वाट बघतंच असायचास. माझ्यासाठी वेळ कुठे आणि कसा निघून जायचा हे कळायचंच नाही.....

तुला माहित आहे, आज आपल्या दोघांचं आवडतं पुस्तक हाती लागलं - ‘To Kill a Mockingbird’, त्याला चाळत असतांना तुझी खूप आठवण आली आणि म्हणाले आज पत्रच लिहावं तुला. किती भांडले होते मी तुझ्याशी, आणि मग अगदी भांडून मी बागेत हे पुस्तक पॅक केलं होतं, लग्नानंतर कॅलिफोर्नियाला येताना. तू पण आधी भांडलास पण तेवढ्याच प्रेमाने पॅक केलं होतंस हे पुस्तक आणि अशी असंख्य अजून भरपूर पुस्तकं. मी किती वेळा संध्याकाळी वाचत बसायचे नाही? तसा माझा स्वभाव एकलकोंडा तेंव्हापण आणि कमी-जास्त प्रमाणात आजपण तसाच रे. Social Norms follow करता करता आता थोडा बोलका झाला आहे खरा पण मूळ स्वभाव तसाच. तेंव्हापण आणि आजही पुस्तकांच्या घोळक्यात मन रमायचं आणि आजपण त्यातूनच खरा निखळ आनंद मिळतो. तुझं मात्र उलटं, प्रचंड मोठी टोळी तुझी आणि रोज कुठली तरी बॅट (क्रिकेट अथवा बॅडमिंटन) खांद्यावर लटकावून कसा संध्याकाळी कॉलनीभर फिरायचास. मी मात्र त्याच्या उलट खोलीत माझ्या पुस्तकांच्या घोळक्यात बसलेले असायचे, पुस्तक हातात घेऊन वाचण्याचं सुख वेगळंच असायचं, तेंव्हापण आणि आजपण. त्यातून येणारा पानांचा वास घेत आणि दुमडलेल्या कानांशी खेळत पुस्तकं चाळताना किती मस्त वाटायचं नाही. आणि ते नाहीतर खोलीभर माझ्या पेंटिंगचा पसारा. ह्यात माझी रोजची संध्याकाळ कशी निघून जायची, ते

कळायचं नाही. आता संसाराच्या व्यापामध्ये तो निवांतपणा मिळतंच नाही.... पण पुस्तकांच्या पानांचे वास, पेन्ट्सचे वास अजूनही मनात आहेत. ते वास येतात आणि मग किती वेळा मनातल्या मनात आठवणींचं चित्रं असंच रंगवते........आणि मग तिन्हीसांजा झाली की आई तुला शोधत बाहेर पडायची किंवा मला पाठवायची. तुझ्या आवाजाचा कानोसा घेत तुला शोधून घरी सुखरूप घेऊन यायचे मी. कधी कधी वाटतं थोडा अल्लडपणा आणि मस्तीखोरपणा मी पण करायला हवा होता, नाही? संध्याकाळी घरात शिरायचो ते उदबत्तीच्या वासानेच, मग हात-पाय धुवून शुभंकरोती म्हणून झाली की रात्रीच्या जेवणाची तयारी सुरु व्हायची rather झालेली असायची....आणि मग, एखाद्या रात्री थालीपीठाचा तव्यावर चुरचुरण्याचा आवाज ऐकला की डोळे टवकारून, आपण दोघेही कसे फ्रिज मध्ये बघायचो. समोर ताजं काढलेले लोणी दिसायचं, त्या बरोबर शेजारी वर्तमानपत्रात गुंडाळलेले मोगऱ्याच्या कळ्यांचे गजरे पण असायचेच. आजही त्या मोगऱ्याच्या फुलांचा वास इतका दरवळतो ना, काय सांगू तुला. मी इथे कॅलिफोर्नियाला आले, तेव्हा सगळ्यात पहिल्यांदी ‘Arabic Jasmine’ चं प्लांट घेऊन आले होते.

....असो, back to the menu, खुसखुशीत थालीपीठ, ताजं लोणी आणि गरमागरम खिचडी - असा लयबद्ध मेनू दिसला की आपल्या दोघांनां कळून जायचं कि आज बाबा घरी परत येणार आहेत त्यांच्या दौऱ्यावरून...... तू कसा खिडकीत त्या रेलिंगवर बसून राहायचास ना, बाबांची वाट बघत? शेवटी कंटाळून पुस्तक हातात घेतलं की खालून gateचा आवाज यायचा आणि त्या बरोबर गाडीचा रिव्हर्स हॉर्न "Attention please, this car is backing up". हे आवाज ऐकले की आपण दोघेजण हातात आहे ते सगळं तसंच टाकून खाली पळत जायचो, आणि बाबांची बॅग हातात घेत त्यांना विचारायचो आमच्यासाठी काय आणलं आहे. आता वाटतं किती अल्लडपणा होता तो, दर वेळेस काय आणणार ते, पण तरी काहीतरी खाऊ आणलेला असायचाच आपल्यासाठी....

..... मला माहीत आहे तू माझ्या बरोबर जिन्यात जी गंमत करायचास त्याची आठवण झाली कि आजही खुद्कन हसू येते तुला. काही कमी मस्तीखोरपणा नव्हता तुझ्या अंगात. किती वेळा जिन्यातला दिवा चालू करायच्या आधीच धूम ठोकून खाली पळून जायचास, कायम पहिलं यायचं असायचं ना तुला? मी मात्रं जिन्यामध्ये अंधारात चाचपडत घाबरत तशीच रडत उभी राहायचे. मग खालून बाबांचा आवाज यायचा, वरून आईची हाक यायची. मी त्या आवाजाचा कानोसा घेत अंधारामध्ये हळू हळू आपली वाट शोधत चालायला सुरवात करायचे तेवढ्यात मला जाणवायचं की माझा हात कोणी तरी पकडत आहे. तुझा स्पर्श जाणवायचा, आणि मग माझ्या कानामध्ये हळूच म्हणायचास, 'ताई, आहे मी, गंमत करत होतो, चल एकत्रं जाऊयात.' आजही मला तशी वाटते रे कधीतरी भीती, वाटते... वाटते डोळ्यासमोर मिट्ट काळोख झाला तर किती भीती वाटेल, आणि मग मनात विचार येतो की आई-बाबा हाक मारतील ना, तू हात पकडशील ना? सोडला कुठे आहेस माझा हात, आणि ह्या वेगवेगळ्या वासाच्या आठवणीत एक नवीन वाट रेखाटेनचं..... आणि मला वाट सापडेलच की. बाबांचा आवाज कानात घुमतो रे, आजही तेच गाणं म्हणत आहेत असा आभास होतो....

"आ चल के तुझे मैं ले के चलूं, इक ऐसे गगन के तले
जहाँ ग़म भी न हो आँसू भी न हो, बस प्यार ही प्यार पले
सूरज की पहली किरण से आशा का सवेरा जागे, चंदा की किरण से धुल कर घनघोर अंधेरा भागे
कभी धूप खिले कभी छाँव मिले, लम्बी सी डगर न खले....."

तुला खरं सांगू का? हे सगळे फक्त आठवणीतले वास नाहीत रे पण आपले श्वास आहेत - लहानपणाच्या आठवणीतले ते आवाज, स्पर्श, वास ह्या सोबत मनातल ते चित्र कायम पूर्ण होतं. त्यासाठी फोटो बघण्याची गरजच नाही आणि बघून तो जुना फोटो अंधुक दिसला तर वाईट वाटण्याचं पण कारण नाही, फक्त डोळे मिटले की ते श्वास परत जगता येतात आणि पुढे जगण्याची पण एक वेगळी उमेद देऊन जातील. (असे लिहीत, राधा हातातलं पेन खाली ठेवते.....)

- **मुग्धा शेठ**, कुपरटीनो, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

Visiting India this Summer?
Want to do **volunteering** over there?
bmmonline.org/summer-volunteering/

Learn more about our Culture through
bmmonline.org/cultural-program/

Launch of Garje Marathi Global Investor Group (GMI)

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



Ras Garba
Artist: Amita Rajadhyaksha
Dimension: 24” x 36”
Medium:Acrylic
Price : $1100
Mandal: MMLA



Rock painting
Artist: Swaroop Ranadive
Dimension: 10” x 6”
Medium:Acrylic
Price : $50
Mandal:

Mandirachi Sandhya
Artist: Supriya
Dimensions: 40” x 40”
Medium: oil on gallery wrap canvas
Price: $799.
Mandal:

Golden Glow
Artist: Neelima Gune-Gole
Dimensions:24”x18”
Medium: Acrylic
Price: $500
Mandal: MMJAX

Anika
Artist: Vinita Mohite
Dimensions:11” x 14”
Medium: Oil on canvas
Price:Not for Sale
Mandal: Seattle Maharashtra Mandal

Soulful Surrender
Artist: Bharti Gorkar
Dimensions:36”x24”
Medium: oil
Price:$2500
Mandal: Seattle Maharashtra Mandal

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.